भक्तीसाठी भांडण कां ?

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri



Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

अध्यात्म भांडार ग्रंथमाला

संस्थापक :- श्री सद्गुरु गणपतराव महाराज, कन्नूर.

भक्तीसाठी भांडण कां?

मूळ कन्नड लेखक :

श्री सद्गुरु गणपतराव महाराज, कन्नूर.

अनुवादक :

प्रॉ. भालचंद्र र. मोडक

एम्. ए. पिएच. डी.

सोऽहं हंसः

अध्यात्म भांडार

शांति कुटीर, कन्नूर

१९८४

किंमत रु. ६-५०

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रकाशक :

वेंकटेश यजमान,

माननीय कार्यदर्शी

अध्यात्म भांडार

शांति कुटीर,

कन्नूर.

जिल्हा-विजापूर (कर्नाटक)

©

Copy rights reserved by the Publisher

तृतीय मुद्रण,

मुद्रक :

एम्. सी. कुलकर्णी.

विजयलक्ष्मी आर्ट प्रिंटर्स,

४९०/१, शेरी गल्ली

बेळगांव. (कर्नाटक)

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri



श्री सद्गुरु गणपतराव महाराज

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

निवेदन

स्वामी रामकृष्ण परमहंसापासून अलीकडच्या एका शतकांत, "आपला उपास्य देवच इतरांच्या उपास्य देवापेक्षा श्रेष्ठ" असा अभिमान बाळगणाऱ्यांच्या मताचा फोलपणा पुरेसा उघडकीस आला आहे. तरीही कांही पंथामध्ये देवताश्रेष्ठत्वा-लाच अतिशय महत्व मिळाल्यामुळे, देवताभिमान अजून अनुयायांच्या मनांत भेदाचे बीज पेरतच आहे. कर्मासक्त कांही वडीलधारी मंडळी मताभिमानाने संकुचितपणा टिकवून आहेत. स्वामी रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, स्वामी रामतीर्थ, चिदंबर महास्वामी, ब्रह्मचैतन्य महाराज, सिद्धारूढ स्वामी, भाऊसाहेब महाराज, महात्मा गांधी इत्यादि महापुरुषांनीं "आमचा देव अन्य सर्व उपास्य देवतांचा अधिपति" अशी फुशारकी मारणाऱ्या मतांध भक्तांच्या अल्पबुद्धीचे पुरेसे खंडन केले आहे. तरी सुद्धा ही देवताश्रेष्ठतेची भावना बऱ्याच ठिकाणी रूढ असलेले आढळते. ह्या परिस्थितीची जाणीव या विषयावर एक पुस्तक लिहिण्याच्या इच्छेस कारण झाली.

वर सांगितलेल्या उद्देशानेच आम्हीं प्रदीप, या कन्नड मासिकात "हरि–हरामध्ये श्रेष्ठ कोण" या नांवची लेखमाला सुरु केली. त्यामध्ये प्रथम "हर हाच श्रेष्ठ" आणि "हरि हाच श्रेष्ठ" असा भक्तांचा तीव्र मतभेद मांडला आणि नंतर त्यांची निरर्थकता दाखवून, "हरि–हरामध्ये भेद नाहीं, ते दोघेही एक परमेश्वरच" असा सिद्धांत समजाऊन दिला. आता, त्या लेख–मालेतील विषयच विस्तृतपणे मांडून, "सर्व धर्मांतील देवता भिन्न-भिन्न नामरूपांतील एक परमेश्वरच होय" ह्या व्यापक तत्त्वाचे विषयच पुस्तकरूपाने प्रकट करीत आहों.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भिन्नभिन्न उपासकांच्या मतांचे स्वतंत्रपणे मंडन करीत असताना, प्रथमदर्शनी तरी आम्हीं त्यांचे म्हणणे उचलून धरत अहोत असे वाटण्यांचा संभव आहे. या संशयाच्या निरसनासाठी सर्व वादींच्या प्रतिपादनाचा समावेश ह्या ग्रंथाच्या पूर्वार्धांत केला आहे. तो पूर्वपक्ष आहे हे आम्हीं वाचकांच्या निदर्शनास आणू इच्छितो. कोणतेही शब्द जसेच्या तसे मुद्रित करून घेऊन, त्यांचा पुनः अक्षरशः उच्चार करणाऱ्या स्फीतवाणी (Tape Record) प्रमाणे आम्हीं सर्व वाद्यांच्या मतांचा पुनरुच्चार केला आहे. वादांगात आमचा कोणताही भाग नाहीं, असो.

ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय उतरार्धांत असून, त्यांत आम्हीं हरि–हरांच्या आणि अन्य सर्वेश्वर देवतांच्या स्वरूपाचा निर्णय करून, देवताभेद केवळ नाममात्र आहे, असे सिद्ध केले आहे. सर्व भक्तांना 'सर्वज्ञत्व, अंतर्यामित्व, व्यापकत्व' इत्यादि लक्षणां–नी युक्त अशा त्यांच्या त्यांच्या देवांच्या एकाच परमेश्वर स्वरूपाचे ज्ञान करून देऊन, त्यांच्यात निष्कारण माजलेले वैमनस्य नाहीसे करणे हाच आमचा उद्देश आहे.

आम्हीं विवेचनास घेतलेला विषय समाजातील धार्मिक अध्वर्यूंच्या अवगाहनाला योग्य असा आहे. शैव आणि वैष्णव पीठांचे जगद्गुरु व धर्मप्रसारक कार्यकर्ते हे उदार चरित, श्रेष्ठ भगवद्भक्त, जनहिताच्या कळकळीचे, विशाल दृष्टिकोनाचे असून, हे थोर लोक ह्या लहान ग्रंथातील सूक्त विषयासंबंधी जनजागृति करतील अशी आम्हीं आशा बाळगतो.

श्री दत्तजयंति, —ग्रंथकर्ता

शके १८९७ मार्गशीर्ष पौर्णिमा

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अनुवादकांचे मनोगत

देव खरोखर एकच असल्यामुळे 'कोणता देव श्रेष्ठ' या प्रश्नाला अर्थच नाहीं. पण 'आपल्या' देवाच्या श्रेष्ठत्वासाठी दुसऱ्यांशीं भांडण करणे, हाच ज्यांना भक्तीचा परमोच्च बिंदु वाटतो, त्यांना त्याचे काय भक्ति करण्यापेक्षा भांडण करणं त्यांना अधिक आवडतं!

"अमुक देव अमुक देवापेक्षा अमुक पटीने श्रेष्ठ किंवा अमुक पटीने कनिष्ठ आहे" असे म्हणणे दुराग्रहाचा कळस होय. असा मूर्खपणा करण्यात कांही विद्वन्मान्य धन्यता मानतात, हे तर फारच आश्चर्यकारक! आस्तिक म्हणवणाऱ्यांची असली पोरकट भांडणे पाहून परमात्म्यालाच कीव येण्या-सारख आहे! गरुडपत्नी, शेषपत्नी आणि रुद्रपत्नी आपापल्या पतीपेक्षा दहा पटीने कमी प्रतीच्या आहेत असे म्हणणे सध्याच्या अंतरराष्ट्रीय महिला दशकांत तर गुन्हा ठरेल!!

कांहीजण तर्कशुद्ध वाद न करता आल्यास "शेषं कोपेन पूरयेत्" या न्यायाने शिवीगाळी करून व अन्य भक्तांना "दैत्य" असे म्हणून मोकळे होतात! तथाकथित राक्षस ज्या नरकात पडतील असे ते म्हणतात, त्या नरकाचे वर्णन ते अशा थाटात करतात की, जणु ते स्वतः काहीं वर्षे त्या नरकात राहून अनुभव घेऊन आहेत!!

श्रुति-स्मृत्यादि मूळ ग्रंथात नसलेल्या कितितरी कल्पना नंतरच्या धार्मिक वाङ्मयात घुसडल्या गेल्या. उदा: रावणवधानंतर शंकर रामाशा युद्ध करण्यास आला हे मूळ वाल्मिकी रामायणात नाहीं. तसेच "महाभारत युद्धाच्या शेवटी भीम आपल्या गदेने सर्व राक्षसांच्या लिंगदेहांच्या चक्काचूर करतो, मग ते राक्षस आपले स्वरूपदुःख शाश्वत अनुभवतात!" असे लिहिले गेले. पण तेंव्हा भीम असतो कुठे? तो तर महाभारताच्या अखेरीसच नामशेष झाला. शिवाय, लिंगदेहाचा चक्काचूर गदेने कसे करता येतो? लिंगदेह चक्काचूर झाल्यावर दुःख भोगायचे कशाने? आनंदरूपी ब्रह्म एकच शाश्वत असताना राक्षस स्वरूपदुःख शाश्वत कसे अनुभवतील? सध्याच्या विज्ञानयुगात तर असल्या भाकडकथावर कुणीच विश्वास ठेवणार नाहीं!

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ज्या गोष्टी प्रत्यक्ष विज्ञान व विचाराने सिद्ध करता येत नाहींत, अशांच्या संबंधी भल्याभल्या कल्पना करून, वाद करीत बसण्यात काय पुरुषार्थ आहे? ही खोटी लढाई कशासाठी? अस्तु.

पुराणांत देवतांचा वर्णन केले ते एवढ्यासाठीच की, भक्तांच्या मनात सगुण मूर्ति चांगल्या रीतीने ठसावी, त्यांचे चिंतन चांगल्या प्रकारे व्हावे आणि त्यांची भक्ति वाढावी. प्रत्यकांनीं आपल्या इष्टदेवतेच्या रूपाने परमेश्वराची एकांतिक भक्ति करावी आणि सर्वत्र-भुतमात्रात आणि मनुष्यमात्रात भगवंताला पहावे, हेच या ग्रंथांत कटाक्षाने सांगितले आहे. त्यासाठी परिश्रमपूर्वक वेद, गीता, पुराणे, नामावली, रामरक्षा, शिवकवच, विष्णुपंजर महिम्न स्तोत्रे व संतवाङ्मय, आणि त्याचप्रमाणे कुराण, बायबल वगैरे अन्य धर्मग्रंथ इत्यादि पुष्कळ साहित्यातील संदर्भ एकत्र करून, **पूज्य श्री सद्‌गुरु गणपतराव महाराज** केलेले तर्कशुद्ध विवेचन येथे दिसून येईल. कन्नड संताच्या उद्‌गारांत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, इत्यादि मराठी संतांच्या विचारांची समानता वाचकांना आढळेल.

धर्माच्या बाबतीत समन्वय साधण्याचे प्रयत्न वेळोवेळी भारतात झाले. तसाच एक स्तुत्य प्रयत्न या छोटचा ग्रंथात केला आहे, हे सहज कळण्या-सारखे आहे

या वृत्तिर्भिन्नदेवेषु विवेकित्वादनिंदिता ।
त्वामनुस्मरतः सा मे हृदयान्मापसर्पतु ॥

भावार्थ-परमेश्वरा माझ्या उपास्य देवाच्या रूपाने तुझे स्मरण करता-ना, विवेकाने निश्चित केलेली, निरनिराळचा उपास्य देवाविषयींची शुद्ध समभावना माझ्या अंतःकरणातून नाहीसे होऊ देऊ नको.

शके १८९८ अक्षय्यतृतीया — **-भालचंद्र र. मोडक.**
दि. २-५-१९७६

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

विद्यमान् श्री सद्‌गुरु गणपतराव महाराज यांचे संक्षिप्त दिव्य जीवन दर्शन.

श्रीसद्‌गुरु गणपतराव महाराज यांचे विषयीं सांगायचे म्हणजे माझ्या जीवनांतील ती एक भाग्याचा दिवस उजाडला असा मला अत्यानंद होत आहे, म्हणून हे परम सुखाचें निधान अध्यात्म भांडार आज आपणापुढें उघडे करण्याची परवानगी घेत आहे.

हे भक्तोद्धारक श्रीसद्‌गुरु श्री शके १८३० भाद्रपद शुद्ध गणेशचतुर्थी या शुभदिनीं विजापूर जिल्ह्यांतील कन्नूर गावी कुलकर्णी यांचे घराण्यांतील सुशील, संपन्न, श्री दत्तभक्त, श्री शिवरामपंत यांच्या पुत्रपंचकांतील तृतीय संतान होऊन जन्मले.. जन्मतःच त्यांची बुद्धी प्रखर व शांत असल्यामुळें ते सर्वांच्या आवडीचे झाले. लहान वयांतच त्यांना श्रीराम दर्शनाचा उत्कंठा लागून राहिली होती. ती दिवसानुदिवस वाढतच गेलीं. विद्यार्जनाची काळीं तें नेहमी प्रथम श्रेणीतच चमकले. यांची ती देवदर्शनाची तीव्र उत्कंठा जणु जाणूनच श्रीसद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराज यानीं यांना बाल वयांतच अवघ्या तेराव्या वर्षी गुरुपदेश केला. त्या नंतर त्यानीं देवदर्शनाचे सत्यस्वरूप काय आहे तें समजून घेतले आणि आत्मचिंतनानें आत्मारामाचे दर्शन घेतले व तें साक्षात्कारी सिद्धपदाला पोचले. श्रीसद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराज यानीं अनेक शिष्योत्तमांना आपल्या गुरुपरंपरेचा संस्कार दिला. त्यांचा शिष्यवर्ग कर्नाटक, महाराष्ट्र प्रांतांत सर्वत्र पसरलेला आहे.

पुढें सद्‌गुरु सिद्धरामेश्वर महाराज यानीं इ. स. १९३६ साली आपलीं कुडी गुरुचरणी विलीन केल्यानंतर त्यांच्या अधिकारी शिष्यानीं सिद्धगिरी, मुंबई, आग्रा, बसवनबागेवाडी

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कारवार, सोलापूर, नासिक, नागपूर प्रभृति प्रमूख शहरी अव्याहत गुरुभक्ति प्रचार चालविला सध्या चालवीतही आहेत. त्याप्रमाणें सद्‌गुरु परंपरेचे शाखा केंद्र, श्रीक्षेत्र कन्नूर येथील श्रीसद्‌गुरु गणपतराव महाराज आपल्या सद्‌गुरुकृपेने भक्तोद्धाराचे कार्य सहज लीलेनें चालवून आपल्या शिष्यगणाला आत्मानंदाची पक्वान्ने वाढीत आहेत. सद्‌गुरु गणपतराव महाराज हें आजन्म ब्रह्मचारी व आधुनिक बि. एस्‌सी. पदवीधर असून आत्मसाक्षात्कारी पुरुष असल्यामुळें सर्वांच्या प्रितीचे स्थान व आत्मीय झाले आहेत. त्यांचे नांव माहीत नाहीं असा मनुष्य विरळाच! आपल्या लोकसंग्रहाच्या कामीं या आमच्या सद्‌गुरुनीं स्वानुभव सुविचार वाढीसाठीं व आत्मसुख मिळवून देण्यासाठीं सर्वांना सुगम सहज समजण्यासारख्या भाषेंत कन्नड व मराठीमध्यें सुमारे चाळीस पुस्तकें लिहिले आहेत. शुद्ध बुद्धीच्या जिज्ञासूना यांचे ग्रंथ म्हणजे एक वरच मिळाला असे म्हण-ण्यांत बिलकूल अतिशयोक्ति नाहीं. सामान्यतः या सर्वच ग्रंथाच्या वरील दोन्ही भाषांतून पुरेशा पुनरावृत्ती निघाल्या आहेत. त्यावरून त्यांच्या प्रतिपादनाची लोकप्रियता सहज समजून येईल. त्यांच्या कार्यांचें क्षेत्र कन्नूर मधील आपल्या शेतीवर उभारलेला 'शांति कुटीर' आश्रम बनलें आहे, म्हणून थेंये प्रतिदिनी कित्येक शिष्य आत्मशांतीं मिळविण्यासाठी येऊन रहात असतात.

श्री सद्‌गुरु महाराजा विषयीं किती लिहावे तितकें थोडेच आहे! त्यांचें व्यक्तिमत्त्व अत्यंत आकर्षक आहे. त्यांची वाणी रसाळ, मुद्रा प्रभावी व शांतदर्शन आहे. त्यामुळें त्यांचें साक्षात् दर्शन होणें हाच परमानंद आहे. तितके सांगून ही लेखणीं गुरुचरणी ठेवीत आहे.

—प्रकाशक

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रकाशकाची विनंति

आज जनतेला ऐक्याची फार अवश्यकता आहे. परंतु लोकांचे धार्मीक विचार वेगवेगळे असल्यामुळे, अनेक मत, पंथ निर्माण झाले आणि योग्य विचारांच्या अभावामुळे, समाजत द्वेष शिरला. मानवीयतेच्या संस्कृतीचा नाश करणाऱ्या दुष्कृत्यांचा प्रारंभ झाला. ही वैषम्याची ज्वाला शांत करण्यासठी अनेक महापुरुषानीं आपले जीवन वेचले व अमर झाले.

आमचे श्रीसद्गुरु गणपतराव महाराज यानीं सर्व धर्मानु–यायींचा परमेश्वर एकच आहे, हे समजावून देण्यासाठी, आपल्या विवेचनाने युक्त असे हे पुस्तक लिहून देऊन सर्वांवर उपकार केला आहे. असे अनेक ग्रंथ त्यानीं जसतेच्या विचारसमन्वया–साठी लिहावे अशी त्यांच्या चरणी मी प्रार्थना करतो.

आमचा देश भावसमन्वयाने सुसंस्कृत होऊन समाज जीव–नांत जागृति घडेल अशी मी आशा बाळगतो. आमचा वाचकवृंद हे पुस्तक आदराने वाचून सुयोग्य विचार पाहून आनंद पावेल व ते विचार आचरणात आणील तर आमचे प्रकाशनकार्य सफल झाले असे मी समजेन.

प्रथम मुद्रणाच्या या ग्रंथाचे नांज "हरिहर आणि उपास्य देवतांचे स्वरूप" होते. आता "**भक्तीसाठी भांडण कां**" या नावांने तृतीय मुद्रणाचे प्रकाशन करतो. प्राध्यापक श्री. भा. र. मोडक यानीं मूळ कन्नड ग्रंथाच्या मराठी अनुवादाचे काम फार थोडक्या अवधीत तडीस नेले. याकरिता मी. प्रा. मोडक यांना चिरऋणी आहे. तसेच विजयलक्ष्मी आर्ट प्रिंटर्सचे मालक मोहनराव कुलकर्णी यानीं अल्पावधीत सुबक मुद्रण काळजीपूर्वक करून दिल्याबद्दल यांचे व नोकरवर्गाचे आभार मानतो.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri **–प्रकाशक**

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अनुक्रमणिका

विषय	पृष्ठ
(पूर्वार्ध) **प्रकरण : १**	
हरीपेक्षा हर श्रेष्ठ असे मत	(१३-२१)
हर श्रेष्ठतेला कारणें (अ ते औ)	१४
वादीमत खंडण	१६
हर सेव्य आणि हरि सेवक असल्याचे प्रतिपादन	१९
हरि-हराला समान मानण्याचे किंवा हरि हरापेक्षा श्रेष्ठ म्हणण्याचे तीव्र खंडण	२०
प्रकरण : २	
हरापेक्षा हरि श्रेष्ठ असे मत	(२१-२९)
१) वेद-शास्त्रांत विष्णूची सर्वश्रेष्ठता (१-७)	२२
२-(३) वासस्थान, वेष, आभरण, परिवार इत्यादिकांच्या परीक्षणाने व भक्तांच्या स्थितिगतीने हराचे हेयत्व व हरीची श्रेष्ठता	२३
४)-(५) हरीच परदैवत याविषयी विवरण, हराकडून हरिपदातीर्थ गंगाधारण इ. कारणे भृगुमुनीचा निर्णय.	२४
६) देवता-तारतम्याच्या हिशेबाने हराची अत्यंत क्षुद्रता.	२५
७) हरि-हरांचे तीन युद्ध प्रसंग व त्यात हराचा पराजय.	२६
विष्णु श्रेष्ठतेविषयीचे आक्षेप निरसन-आक्षेप घेणारे शिवभक्ताला घोर नरक.	२८
८) द्वैतमताचार्यांकडून अद्वैताचे व शिवश्रेष्ठतेचे खंडण सुपूर्त. विष्णुश्रेष्ठतेची घोषणा.	२९
प्रकरण : ३	
देवी, गणेश, येहोवा, अल्ला इत्यादि दैवतच सर्वश्रेष्ठ असे मत	(३०-३७)

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

१) हरि-हरापेक्षा देवीच श्रेष्ठ असे मत ३०
२) गणेशच सर्वश्रेष्ठ देव असे मत. ३१
३) प्राचीन वैदिक देवतांचे सर्वश्रेष्ठत्व. ३२
४) ब्रह्मदेवच सर्व श्रेष्ठ असे मत. ३४
५) येहोवा हाच सर्वश्रेष्ठ असे मत. ३५
६) अल्ला हाच सर्वश्रेष्ठ असे मत. ३६

(उत्तरार्ध) प्रकरण : १

हरि, हर आणि सर्व उपास्य देवता एक परमेश्वरच. (३८-४९)
हरि-हरांचा स्वरूपाचा शोध ३८
१) रुद्र व पुरुषसूक्त यांच्या परीक्षणांने शिव-विष्णूंचा स्वरूपशोध ३९
२) शत, अष्टोत्तरशत आणि सहस्रनामे ४२
३) कवच, पंजर आणि रक्षा ४४
४) महिम्न स्तोत्रे ४६
५) गीता ४७

प्रकरण : २

हरि, हरांचा स्वरूपशोध (पुढे चालू) ५०-५७
१) नामस्मरणाचे महत्व ५०
२) सर्वावयवांनी व मनाने भक्ती ५१
३) देवाच्या रूपदर्शनाची असा ५२
४) शिवध्यानाविषयी आक्षेप व त्याचे उत्तर ५५

प्रकरण : ३

हरि, हरांच्या स्वरूपाचा निर्णय (५८-८३)
पीठीका ५८
१) उपासनेसाठी परमेश्वराची रूपकल्पना "
२) शिव-विष्णु देवतांचे स्वरूपलक्षण (१-४) ६१
३) ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर हे तीनही परमेश्वर ६४

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

४) पुराणांतर्गत हरि-हरांचा अभेद व हरि-हर निंदेचा
कटु निषेध (१-४) ६५
५) हरि-हरामध्ये भेद करणे महापातक ६७
६) परमेश्वर एकच आहे. (१-४) ६८
७) "आमच्या धर्मा-देवामुळेच स्वर्ग, दुसऱ्यांच्या धर्मा-देवामुळे नरक"
असल्या दुराभिमानाचे खंडन ६९
८) उपास्य देव "परमेश्वराच्या" आणि 'अन्य देवतांच्या'
भक्तीचे रहस्य ७१
९) हरि-हरांच्या एकत्वासाठी झालेले प्रयत्न (१-५) ७४
१०) सर्व देवांच्या एकत्वाबद्दल माणिक प्रभूंचा अभिनव कोटिक्रम ७६
११) हरि-हरांचा व सर्व उपास्य देवतांच्या एकत्वाविषयी
महापुरुषांचा उपदेश (१-६) ७७
१२) श्री सद्गुरु भाऊसाहेब महाराज उमदीकर
त्यांच्या सांप्रदायातील हरि-हर ऐक्य ८०
१३) शेवटचा सिद्धांत-हरि आणि हर एकरूप आहेत हा निर्णय आणि
तदनुषंगाने सर्व उपास्य देवतांच्या ऐक्याचा सिद्धांत ८२

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भक्तीसाठी भांडण कां ?

(पूर्वार्ध)

प्रकरण : १

"हरीपेक्षा हर श्रेष्ठ" असे मत

शिवभक्त शिवाची सर्वश्रेष्ठता, विशेषतः शिव विष्णूपेक्षा श्रेष्ठ आहे हे पुढील कारणांनी सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात--

१) महादेव, ईश्वर, परमेश्वर वगैरे सर्वोत्तमतेची नावें शिवालाच असल्याकारणानें, शिव हाच देवदेवश आहे, विष्णू नव्हे.*

२) 'सोमः पवते,' 'शिव एको देवः', 'अग्निमिळे पुरोहितं' इत्यादि असंख्य वेदमंत्र शिवाच्या श्रेष्ठतेचे वर्णन करतात. शिवाय रुद्राध्याय तर सुप्रसिद्धच आहे.

३) (अ) प्रणव(ओंकार) शिवपरच आहे, विष्णुपर नव्हे.
प्रणवो वाचकस्तस्य शिवस्य परमात्मनः ।' -शिवपुराण
(आ) गायत्री मंत्र शिवपर आहे. कारण पूर्वी गायत्रीने

---

* तूंच शाश्वत स्वामी आहेस
हें तुझे महात्म्य सर्व जगच जाणते
तू महा (सर्व श्रेष्ठ) देव-महादेव आहेस
महदेव म्हटल्यावर पुढे कोणी शब्दच काढू शकत नाहींत.
-बसवेश्वर वचन

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

शंभूला असा वर मागितला कीं 'माझ्या मंत्रात शिवनाम नसलें तरी 'वरेण्यं' 'भर्गः' 'बुद्धीचा प्रेरक' हे सर्व शब्द तुला उद्देशूनच असल्यामुळे तो (गायत्री मंत्र) जप करण्यास योग्य होवो.'' त्या-प्रमाणें वर मिळाल्यामुळे गायत्री मंत्र शिवपर आहे असे सिद्ध होते.

शिवरहस्य

इ) ''ॐ नमः शिवाय'' हा तारक मंत्र आहे. हा वेदमंत्र खेरीजकरून अलीकडे राम–कृष्णादिपर मंत्र प्रचलित झाले असले तरी, ते तारक मंत्र होऊं शकत नाहींत.

ई) व्यासप्रणीत १८ पुराणापैकी, १० शिवपुराणे, ४ विष्णु-पुराणे आणि ४ ब्रह्म, अग्नि वगैरे देवतांची पुराणे आहेत. पुराणांतील श्लोकसंख्या पाहिल्यास, शिवपुराण व स्कंदपुराण ही जवळ जवळ लक्ष श्लोकांची आहेत, बाकीची शिवपुराणही मोठी आहेत. विष्णुपर पुराणे थोडी व लहान आहेत. यावरून अधिक स्तुती कोणाची केली आहे हे दिसून येते व विष्णूपेक्षा शिव श्रेष्ठ हे साधार सिद्ध होते.

वरील विवेचनाचा सारांश, शिवच सर्व श्रेष्ठ देव आहे असे श्रुति-शास्त्र-पुराणें सांगतात.

उ) विष्णूला युगयुगांतरी अनेक जन्म आहेत; परंतु शिव जन्मला असें आपण कधी ऐकले आहे कां? विष्णूला जन्म असल्या-मुळे मरणही आहेच; शिवाला मात्र जन्म नसल्यामुळे तो अमर आहे. या कारणानें साहजिकच शिव विष्णूपेक्षा श्रेष्ठ ठरतो.

विष्णु अवतार घेतो असे तुम्हीं त्यांचें वर्णन करतां, तर त्या अवतारातील वैगुण्य पहाः– विष्णूने मासा, कासव व डुक्कर अशी रूपें धारण केली! नरसिंहानें ... वामन खुजा

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तर बुद्ध नागडा!! शिवाय विष्णु नास्तिक बुद्ध झाला, हे खरोखर विपरीत होय!

ऊ) समुद्रमंथनाच्या वेळी हालाहल विष निघाले तेंव्हा विष्णु वगैरे देव महादेवालाच शरण गेले. समुद्राचे मंथन करताना निघालेल्या कौस्तुभ मणि, उच्चैःश्रव, ऐरावत वगैरे उत्तमोत्तम वस्तू स्वार्थानें आपण घेऊन, महाभयंकर विष मात्र शिवाला देणारे विष्णू इत्यादि देव काय मोठे? असो. देवतांच्या प्रार्थने–नुसार कालकूट विष पिणाऱ्या शिवाची क्षमाशीलता व सर्व–शक्तिमत्त्व आपोआपच सिद्ध होते.*

ए) आकाशांतून वेगाने पडून जगाचा नाश करण्यास उद्युक्त झालेल्या गंगेला महादेवाने आपल्या जटेत धारण केले. आणि आर्यावर्तात मंदगतीने सोडून लोकांवर अनुग्रह केला. असे करणे विष्णु वगैरे देवांना साध्य झाले काय? गंगेच्या सान्निध्यामुळे त्या देवतांनाच विशेष महत्व प्राप्त झाले!

ऐ) वीरभद्रानें शिवनिंदक दक्षब्रह्माचा यज्ञ ध्वंस केला व त्याला मारले. त्या यज्ञांत हविर्भाग ग्रहण केलेल्या विष्णु आदि देवानीं दक्षब्रह्माचे रक्षण कां केले नाहीं?

ओ) विष्णु जगाचें रक्षण करतो असे म्हणता, मग जेंव्हा शिवाने मदनाला जाळून टाकले, तेंव्हा विष्णूने स्वपुत्राचे रक्षण कां केले नाहीं?

* विष्णु इत्यादि देवहो, समुद्र मंथनाच्या वेळी हालाहाल विष, निघाले तेंव्हा तुम्हीं सगळे देव कोठे गेला होता? तेव्हा तुम्हीं सगळे मिळून शिवाला शरण जाण्याचे वेळी, तुमचा मोठपणा कोठे गेला होता? याच्यावरूनच हर देवाधिदेव आहे व तुम्हीं त्याचे सेवक आहा, हे समजून घ्या. – बसवेश्वर वचन

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

 CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

औ) पौराणिक आधाराशिवाय आपण निरनिराळ्या देवतांच्या देवस्थानांचे अवलोकन केले तर, असे दिसून येईल कीं, भारतातील प्रसिद्ध पुरातन क्षेत्रे बहुतेक शिवाची स्थानेच आहेत. काशी, रामेश्वर इत्यादि १२ ज्योतिर्लिंगे आणि अनेक शिवक्षेत्रे सुप्रसिद्ध आहेत. यावरून शिव सर्वश्रेष्ठ आहे हे सिद्ध होते.

वादीमत खंडण

विष्णुभक्त :– पद्मपुराणांतील शिव–राघव संवादामध्ये "श्रीराम रामरामेति ह्येतत्तारकमुच्यते" असें शिवानेच सांगितले आहे. आणखीन एका पुराणांत "शंकराने काशीमध्ये होम आणि पूजा करून राममंत्राचा जप केला" असे सांगितले आहे. यावरून श्रीरामनामच तारकमंत्र आहे व काशी विष्णुक्षेत्र आहे असे सिद्ध होते.

शिवभक्त :– अथर्वशिखा इत्यादि उपनिषदांत, शिवरहस्य वगैरे पुराणांत आणि अनेक अन्य ग्रंथामध्ये प्रणवसहित पंचाक्षरी मंत्र हाच तारक मंत्र असल्याचे घोषित केले आहे आणि काशीचा आराध्यदेव विश्वेश्वरच असल्याचें साऱ्या जगाला माहीत आहे. असे असूनही "काशीचे अधिदैवत विष्णु, रामनाम हेच तारकमंत्र, विश्वेश्वर रामनामाचा जप करतो" वगैरे म्हणणे हास्यास्पद होय!

विष्णुभक्तः– ते असो, शिवाने कालकूट विष प्राशन केल्याची प्रौढी मिरवितोस, पण त्यातील मर्म ऐकं. शिवाने रामनामाचा जप करीत विष प्राशन केले, म्हणून तो ते विष सहन करूं शकला. "ते घोर विष पाहून शिवाने हृदयांत गरुडध्वज नारायणाचे स्मरण केले आणि 'अच्युतानंत गोविंद' या मंत्राचा जप करीत विष प्याला" असे भागवतामध्ये सांगितले आहे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri.

शिवभक्त:– "ब्रह्मा, विष्णु इत्यादि देव हालाहलाचे नियंत्रण करूं शकले नाहीत, म्हणून त्यानीं लोकरक्षणासाठी शंकराची प्रार्थना केली" असे सर्व पुराणे, महाभारत व भागवत वगैरे शेकडो ग्रंथात सांगितले आहे. म्हणून कोठेतरी स्वार्थाने लिहिलेला अच्युतजप खरा होऊ शकत नाहीं. "स्वत: विष्णूच देवादिकासह कैलासाला गेला व त्यानें कालकूटाचे शमन करण्याची शंकराला विनंति केली" असे शिवसंहितेत व इतरत्र ही स्पष्ट वर्णन आहे.

विष्णुभक्त:– ते काहीं असो, शिवानें गंगेला जटेत धारण केले, इतक्यावरूनच विष्णूची श्रेष्ठता नि:संशय सिद्ध होते. कारण, विष्णूच्या पायापासून निघालेल्या गंगेला शिवाने मस्तकावर धरले!

शिवभक्त:– गंगेने स्वत: भगीरथाला सांगितले की "राजा, मी पृथ्वीतलावर येईन. परंतु माझा असह्य वेग केवळ नीलकंठच सहन करू शकेल; म्हणून तू जगाच्या रक्षणासाठी त्यालाच शरण जा." यावरून शंकराने लोकानुग्रहासाठी गंगेला धारण केले, स्वत:च्या उद्धारासाठी नव्हे! समजले ना?

विष्णुभक्त:– ठीक आहे, तसेच समजू. तरीपण शिवाच्या डोक्यावर वसलेली गंगा विष्णूच्या पायापाशी लोळते हे खरेच. ह्या एकाच गोष्टीवरून विष्णूची श्रेष्ठता सिद्ध होते.

शिवभक्त:– अरे पंडिता, तूं सगळी पुराणें वाचलीं नाहींस असे दिसते; कारण, गंगा दोन आहेत–हिमालयाची कन्या व भगीरथ राजाच्या प्रयत्नाने भूलोकी आलेली गंगा एक आणि विष्णुपादापासून निघून, मेरुपर्वताहून तीन दिशांना वाहून वेग–वेगळ्या समुद्रांना मिळणारी गंगा दुसरी. अर्थात् विष्णूच्या पाया-

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पासून वाहणारी गंगा शिवाच्या मस्तकावर असणारी गंगा नव्हे. हैमवती गंगेची श्रेष्ठता विष्णुपादाच्या गंगेला येत नाहीं, समजले?

विष्णुभक्त:– ती गंगा, ही गंगा असला वाद सध्या बाजूला ठेऊंया. विष्णू सत्वगुणी असून पालनकर्ता आहे व शिव तमोगुणी असून संहारकर्ता आहे-हा श्रुति-शास्त्रादिकांचा सर्व– संमत अभि–प्राय तरी तुला मान्य आहे ना? शिव सर्वांना रडवितो म्हणूनच त्याला रुद्र असे नांव आले आहे! यावरून श्रेष्ठ कोण ते तूच सांग.

शिवभक्त:– सृष्टिकार्याच्या पूर्ततेसाठी परशिव रुद्ररूपानें संहार करतो, हे काहीं खोटे नाहीं. पण तो निर्दयपणा झाला काय? जीवांच्या कल्याणासाठीच परमेश्वर सृष्टिसंहार करतो; अर्थात् तो दयाळूच ठरतो. आता रुद्र शब्दाचा खरा अर्थ ऐक–

रुद्दुःखं दुःख हेतुर्वा तं द्रावयति नः प्रभूः ।
रुद्र इत्युच्यते सद्भिः शिवः परम कारणम् ॥ स्कंद पुराण

भावार्थ :– दुःखाचा किंवा दुःख कारणांचा नाश करणाऱ्या आमच्या प्रभूलाच सज्जन रुद्र म्हणतात, शिवच परमकारण आहे. समजले की नाहीं?

विष्णुभक्त:– ते काहींही असले तरी शिव हा निकृष्टच. कारण शिव (मंगल) असे नांव धारण करणाऱ्या तुमच्या शंकराचा वेष काय, भूषणे काय, वागणूक काय, सर्वच अमंगल! तो हत्तीचे ओले कातडे पांघरतो, हातात कवटी धरतो, अंगाला मसणांतील राख फासतो–सगळंच घाणेरडं!

शिवभक्त:– शतमूर्खा, शिवाने सर्व देवतांना–विशेषतः वष्णूला 'विभूति' म्हणजे ऐश्वर्य दिले आणि वैराग्याचे महत्व

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

दर्शविण्यासाठी आपण मात्र 'विभूति' म्हणजे भस्म धारण केले× कपाल, चर्मांबर इत्यादि वस्तू वैराग्यस्थिति दाखवितात.*

हर सेव्य आणि हरि सेवक असल्याचें प्रतिपादन

४) १. विष्णू महान् शिवभक्त असल्याचे पुराणांतरी प्रसिद्ध आहे. तो आपल्या इष्टदेवाची म्हणजे शंकराची दररोज हजार कमळांनी पूजा करीत असे. एक दिवस अचानक एक कमल कमी पडले. तेंव्हा विष्णूने आपलें नेत्रकमल काढून समर्पण केले! या अनन्य भक्तीने संतुष्ट होऊन शंकराने विष्णूला सुदर्शन चक्र दिले.

२. एकदा विष्णू आणि ब्रह्मदेव यांच्यामध्ये आपापल्या श्रेष्ठतेबद्दल वाद सुरु झाला. तेव्हां शंकर तेथे लिंगरूपाने प्रगट झाला व सांगितलें कीं, "जो माझे पाय किंवा मस्तक पाहून प्रथम परत येईल तो श्रेष्ठ." त्या आदेशानुसार ब्रह्म शिवाचे मस्तक पाहण्यासाठी हंसरूपानें वर उडाला व विष्णू वराहाचे रूप घेऊन भूमी खणत खणत खाली निघाला. ब्रह्मदेव कितीही वर गेला तरी शिवाचे मस्तक दिसले नाहीं, तरी पण त्यानें परत येऊन 'मला मस्तकाचे दर्शन घडले" असे खोटेच सांगितले! त्यामुळे ब्रह्म पूजेला अनर्ह ठरला. इकडे विष्णू सप्त पाताळापर्यंत खाली गेला तरी शिवाचे पाय दिसेनात; म्हणून परत येऊन त्यानें "तुझा तळ सापडणे अशक्य! तूच माझे रक्षण कर" अशी विनवणी केली आणि वर मिळविला×

× सब विभूति हरिकू दे मांगी ।
धरत विभूति आप नित त्यागी ॥ –विचारसागर, सप्तम तरंग

* ... न हि स्वात्मारामं विषयमृगतृष्णा भ्रमयति ॥ –शिवमहिम्नः ८

× तवैश्वर्यं यत्नाद्यदुपरि विरिंचिर्हरिरधः ।
परिच्छेत्तुं यातौ .... ॥ –शिवमहिम्नः १०

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

३. रामाने रामेश्वर येथे शिवलिंगाची स्थापना केली, यावरून राम शिवभक्त होता हे निर्विवाद सिद्ध होते. राम अयोध्येमध्ये राज्य करीत असता, त्याने कोटयावधी लिंगांची स्थापना केली असे अध्यात्म रामायणांत सांगितले आहे, यापेक्षा रामाच्या शिवभक्तीविषयी दुसरा पुरावा नको.*

विष्णुभक्ताचा आक्षेप– महाभारत, पद्मपुराण, पांचरात्र आगम वगैरे ग्रंथामध्ये विष्णू हाच सेव्य आहे सांगितले आहे. ते सारे ग्रंथ खोटे काय?

शिवभक्ताचे उत्तर– महाभारतात आणि कांहीं पुराणांत विष्णू सेव्य असल्याचे सांगितले आहे खरे; परंतु विष्णूचेही उपास्य दैवत शिव परम सेव्य आहे, असा त्यांचा आशय आहे; हे श्री अप्पय्य दीक्षितानीं लिहिलेल्या 'भारत तात्पर्य' या ग्रंथावरून समजण्यासारखे आहे. आतां पांचरात्रादि आगमामध्ये "हरि सेव्य आणि हर सेवक" असे लिहिले असल्यास ते दुष्ट आगम त्याज्य होत. ते कसे हे वाचस्पति मिश्राने रचिलेल्या "परिमल" ग्रंथात पहावयास मिळेल.

हरि हराला समान मानण्याचे किंवा हरि, हरापेक्षा श्रेष्ठ म्हणण्याचे तीव्र खंडण

५) आम्ही आतांपर्यंत साधार दाखवून दिल्याप्रमाणें हर जगाचा एकमेव स्वामी असून, हरि, ब्रह्म, इंद्र इत्यादि देव

---

* i) कोटिशः स्थापयामास शिवलिंगानि सवंशः ।

–अध्यात्म रामायण, उत्तर कांड :४–२७

ii) हरि सेवक हर सेव्य बखान्यो । रामचंद्र रामेश्वर मान्यो ॥
स्कंद पुरान व्यास बहु भाख्यो । हरि सेवक हर सेव्य हि राख्यो ॥

विचारसागर तरंग : ७

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

त्याचे सेवक होत. पण काहीं मूर्ख लोक हर आणि हरि समान आहेत असे समजतात. तर सेवक कधीतरी स्वामीची बरोबरी करू शकेल काय? सर्वथा शक्य नाही.

हरि काळा, तर हर गोरा, हरीला दहा वेळा मृत्यु आला,
तर हर अमर राहिला, मग दोघे सारखे कसे?

–बसवेश्वर वचन

सारांश, हरि-हरांचे समानत्व कालत्रयीही अशक्य. हरापेक्षा हरि श्रेष्ठ आहे असे म्हणणे तर महापातक होय. "हरि सर्वोत्तम" असे बाहू उभारून सांगणाऱ्या व्यासाचे बाहू नंदीने तोडून टाकल्याची हकीकत, स्कंद पुराणाच्या काशीखंडात सांगितले आहे·

लोकहो,
ब्रह्मा विष्णु आणि सगळे देव
कोणत्या महा देवाची पादपूजा करून
आपापली मोठी पदवी मिळविली, हे तरी विचार करून पहा.
बाकीच्या क्षुद्र देवांचा नियंता जगत्पति एकमेव देव, असा
आमच्या शंकराशिवाय दुसरा देव नाही
हे तीनही लोक जाणतील असे मोठ्याने डांगोरा पिटतो.

–अखंडेश्वर वचन

प्रकरण : २

"हरापेक्षा हरी श्रेष्ठ" असे मत

विष्णुभक्त विष्णूची सर्वश्रेष्ठता, विशेषतः विष्णु शिवापेक्षा श्रेष्ठ आहे, हे पुढील कारणानीं सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात–

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

१) "विष्णू हाच जगत्कर्ता परमात्मा आणि देवदेवेश आहे" असे वेद व सर्व शास्त्रे निर्णायकपणें सांगतात--

१. **सर्वे वेदा यत्पदमामनंति ।**

वासुदेव परा वेदाः । —श्री. आनंदतीर्थ

२. **एको विष्णु म्हणून वेद नाना तऱ्हेने सांगतात.**

—पुरंदरदास (पुरंदरदासाची कीर्तने भाग ४ पद १३१)

३. ऋग्वेदात "हे विष्णो! पूर्वी होऊन गेलेल्या, आता असणाऱ्या व पुढे होणाऱ्या कुणालाही तुझा अगाध महिमा प्राप्त असणे शक्य नाहीं" असे सांगितले आहे. **ऋग्वेद : ५।६।२४**

४. ऋग्वेदाच्या अंभ्रणीसूक्तात लक्ष्मी म्हणते कीं "माझ्या इच्छेप्रमाणे मी कुणालाही ब्रह्मपदवी किंवा रुद्रपदवी देऊ शकते." त्यावरून ब्रह्म किंवा रुद्र यांच्यापेक्षा लक्ष्मीची श्रेष्ठता सिद्ध होते. परंतु लक्ष्मी तरी

"मम योनिरप्स्वंतः समुद्रे ।"

म्हणजे "माझे कारण असणारा समुद्राच्या खोल पाण्यात राहतो" असे सांगते. त्यावरून समुद्रात असणारा शेषशायी विष्णूच सर्वोत्तम आहे असा निर्णय निघतो. **—अनुव्याख्यान : १।१।२**

५. वेदांतप्रसिद्ध ब्रह्मशब्दाने विष्णूच अभिप्रेत आहे.

—श्री आनंदतीर्थांचे ब्रह्मसूत्रभाष्य

६. पद्मपुराण अणि शिवपुराणांत प्रत्यक्ष शंकरानेंच मार्कंडेयाला "मुला, मी केवळ भोग देऊ शकतो. मोक्ष देण्याला विष्णूच समर्थ आहे"* असे सांगितले आहे.

७. हरीच सर्वोत्तम, हरीच परदेवता ।

विश्वतश्चक्षु तूच विश्वतोमुख तूच ।

---

* अहं भोगप्रदो वत्स मोक्षदस्तु जनार्दनः ।

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

विश्वतोबाहु तूच विश्वोदर तूच ॥
विश्वव्यापक सूत्रधारी तूच ।
विश्वनाटक श्रीविष्णो नमो नमो ॥ -पु. की. २-३

अहाहा ! श्रीहरीला असलेले परम ऐश्वर्य अन्य कोणत्या तरी देवास आहे काय? पहा–

२) हरि आणि हर समान आहेत असे म्हणणाऱ्यानीं त्या दोघाचे वासस्थान, वस्त्राभरण, परिवार इत्यादिकाकडे जरा डोळे उघडून पहावे. तेंव्हा–

हरीचे मंदिर वैकुंठस्थान, हराचे मंदिर स्मशान,
हरी नेसतो पीतांबर, हर पांघरतो गजचर्मांबर,
चंदन कस्तूरी हरीच्यां अंगी, स्मशानाची राख हराच्या अंगी,
ब्रह्मादि देव हरीचा परिवार, प्रेतभक्षक पिशाच हराचा परिवार,

ह्या सर्व गोष्टी लक्षात येऊन, कोण श्रेष्ठ हे आपोआपच कळते. -पु. की. २-८

श्री हरी साम्राज्यानें भूदेवीचा पति व ऐश्वर्यानें लक्ष्मीपति! वडीलपणाने ब्रह्मदेवाचा पिता, पवित्रतेनें गंगेचा जनक आणि देवत्वानें देवाधिदेव! ! सौंदर्यानें जगन्मोहक, व शौर्यानें राक्षसांचा संहारक! वाहनानें गगनविहारी गरुडवाहन व पर्यंकाने पृथ्वीधर शेषावर पहुडलेला! असले महावैभव सर्वोत्तम श्रीहरीला सोडून दुसऱ्या देवाच्या नशिबात कुठून असणार? -पु. की. २-१६४

३) हरि श्रेष्ठ किंवा हर श्रेष्ठ याबद्दल फारसा विचार करण्याचे कारण नाहीं, त्यांच्या भक्तांची स्थिति पाहिले म्हणजे कोण श्रेष्ठ याचा निर्णय आपोआप होईल. हे पहा शिवभक्त बाणासुराचे हजार हात कापले! हरभक्त हिरण्यकाशिपु, रावण, जरासंध इत्यादिकांचा नाश झाला. पण हरिभक्त प्रल्हाद,

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

विभीषण, पांडव हे विजयी झाले ! अशी आणखी शेकडो उदाहरणे देता येतील. एवढेच काय, शिवापासून वर मिळविणारे बहुतेक भक्त दुष्ट राक्षसच होते! त्यांच्यापैकी अनेकानें शंकराला ठार मारण्याचा ही प्रयत्न केला! अशा अनेक प्रसंगी विष्णूनेच शंकराला वाचविले !

—पु. की. २-६३

४) लक्ष्मीकांत श्रीहरीच सर्वश्रेष्ठ दैवत असल्याचा निर्णय कधीच होऊन गेला आहे. कसे ते पहा—

i. स्वयंवराचे वेळी लक्ष्मीनें ब्रह्मा, शंकर इत्यादि देवांची उपेक्षा करून, विष्णूच्या गळ्यात माळ घातली, तेव्हाच हरीचे सर्वोत्तमत्व सिद्ध झाले.

ii. ब्रह्मदेवकृत हरिचरण प्रक्षालनाने निर्माण झालेल्या, हरिपादतीर्थ गंगेला ज्यावेळेस शिवाने सर्व देवांसमक्ष शिरावर धारण केले, तेंव्हाच हरीच्या सर्वोत्तमत्वाचा निर्णय झाला आहे.

iii. शिवाच्या वराने मत झालेल्या वृकासुरानें शिवालाच मारण्यासाठी त्याचा पाठलाग केला, तेंव्हा हरीने आपल्या भक्ताचे म्हणणे शंकराचे रक्षण केले, त्यावेळीच हरि सेव्य आणि हर सेवक हे सिद्ध झाले.

सारांश, हरीचे सर्वोत्तमत्व केंव्हाच ठरून गेले आहे.

—पु. की. २-७

५) ब्रह्मा, विष्णु आणि शिव यांच्यामध्ये कोणता देव श्रेष्ठ हे ठरविण्यासाठी, भृगुमुनि सत्यलोक, कैलास आणि वैकुंठ येथें गेला आणि तीन्ही देवांचा अपमान करून परीक्षा केली, तेंव्हा ब्रह्मा आणि शिव क्रोधाविष्ट झाले, विष्णूने मात्र आपल्या

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

छातीवर लाथ मारणाऱ्या मुनींच्या पायाची पूजा केली! तेंव्हा विष्णूच सर्वश्रेष्ठ देव आहेत असे भृगुमुनीने जाहीर केले.**पु.की.४-१३१**

६) देवतांमध्ये कोणत्या देवतेची किती योग्यता आहे, याचा हिशेब असतो. हे तारतम्य न जाणता, उगीच सर्व देव सारखे आहेत असे म्हणण्यात काय अर्थ आहे? आमच्या द्वैत शास्त्रात तारतम्याचे समीचीन विवरण आहे. त्यातील काहीं भागाचे निरीक्षण केले तरी, हरीची अगाध श्रेष्ठता व हराची अत्यंत क्षुद्रता लक्षात येईल. तो हिशेब असा–

हरि सर्वश्रेष्ठ, हरीपेक्षा लक्ष्मी अनंत पटीने कमी, ब्रह्मा–वायु हे लक्ष्मीपेक्षा कोटि पटीने अधम, सरस्वती-भारती ह्या ब्रह्म–वायूपेक्षा शंभर पटीने कनिष्ट, गरुड, शेष आणि रुद्र सरस्वती-भारतीपेक्षा शंभर पटीने निकृष्ट, (येथे रुद्रापेक्षा शेष मोठा हे गमनार्ह) गरुडपत्नी, शेषपत्नी आणि रुद्रपत्नी आपल्या पतीपेक्षा दहा पटीने कमी, पार्वतीपेक्षा इंद्र आणि मन्मथ दहा पटीने कसिष्ट इ. इ. इ. **–हरिकथामृतसार, संधि-२०**

आतां वरील तारतम्याप्रमाणे हराचे मूल्यमापन करूया. प्रथमतः लक्ष्मी हरीपेक्षा अनंतपटी कमी म्हणून सांगितले असले तरी हिशोबासाठी कोटि पटीने कमी असेच समजूया. त्या पक्षीही,

$$\text{हर} = \frac{\text{हरि}}{\text{कोटि}\times\text{कोटि}\times\text{शत}\times\text{शत}}$$

$$= \frac{\text{हरि}}{10\times^{7}10^{7}10^{2}10^{2}} = \frac{\text{हरी}}{10^{18}} = \frac{\text{हरि}}{1\ \text{परार्ध}}$$

$$= \frac{\text{हरि}}{1000000000000000000}$$

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

या प्रमाणे हरीचा एक अत्यंत क्षुद्र अंशांशांशां...शांश असलेला हर हरीपेक्षा अत्यंत निकृष्ट आहे. हे वेगळे सांगणे नकोच.

७) पुराणांमध्ये शिव-विष्णूंच्या युद्धाचे वर्णन आले असल्यास, जय–पराजयावरून त्यांची श्रेष्ठ-कनिष्टता सहजच ठरते. असा एक प्रसंग भागवताच्या १०व्या स्कंदात आला असून, तेथील सुंदर वर्णन ऐक–

"बाणासुराच्या सहाय्यासाठी प्रत्यक्ष शंकर आपल्या साऱ्या गणांसह आला. एका बाजूस बाणासुर व शंकर आणि दुसऱ्या बाजूस यादव व कृष्ण असे घनघोर युद्ध झाले. कृष्णाची शंकराशी, प्रद्युम्नाची कार्तिकेयाशी, सात्यकीची बाणासुराशी व बलरामाची कुभांडाशी गाठ पडली. प्रद्युम्नाने कार्तिकेयाला गदेने जखमी केले, तेंव्हा तो युद्ध भूमीतून पळून गेला. कृष्णानें शंकरावर जृंभकास्त्र सोडले, त्यामुळे शंकराला एकसारख्या जांभया येऊं लागल्या व तो युद्ध करण्यास असमर्थ झाला. कृष्णाने शंकराचे अनुचर भूत प्रेत, प्रमथ, गुह्यक इत्यादिकांचा शाङ्‌र्ग धनुष्याने संहार करू लागला, तेंव्हा त्यानीं रणांगणातून पळ काढला. शेवटी मुकुंद आपल्या सुदर्शन चक्राने बाणासुराचे बाहू तोडू लागला; तेंव्हा मात्र शंकरानें बाणासुराला जीवदान द्यावे अशी प्रार्थना केली .."

–भागवत, १०वा स्कंद (उ) अध्याय–६४

श्री आनंदतीर्थ यानीं हरिहरांच्या आणखीन एक युद्धाचा प्रसंग असा वर्णिला आहे–सर्व देवांनी हरिहरांना विनंति केली कीं, 'तुम्हामध्ये श्रेष्ठ कोण हे ठरविण्यासाठी आपण उभयता अमोरा–समोर उभे राहून युद्ध करावे". ती मान्य करून दोघेही आपापली धनुष्ये घेऊन एकमेका समोर टाकले. परंतु विष्णूच शिवाचा अंतर्नियामक असल्यामुळे, असा चमत्कार घडला कीं,

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

शिव शिलेप्रमाणे स्तब्ध झाला! त्याला पाहताही येईना किंवा हालचाल करताही येईना, मग तो युद्ध कसे करणार? हे आश्चर्य पाहून साऱ्या देवांनीं हरीच्या अगाध शक्तीची प्रशंसा केली, आणि हरापेक्षा हरी श्रेष्ठ अशी उच्चस्वरात घोषणा केली! *

त्याचप्रमाणे, रावणाचा वध झाल्यावर शंकर रणांगणावर आला. आपल्या भक्ताचा वध केला म्हणून शंकराने रामाला युद्धाचे आव्हान दिले. ते स्वीकारून रामाने धनुष्यावर प्रत्यंचा चढवून टणत्कार करता, त्या आवाजानेच शंकर थरकांपत भूमीवर कोसळला! तेंव्हा शंकराला विवेक सुचून रामाच्या पायावर लोटांगण घातले व "देवा मला क्षमा कर. मी नेहमी तुझा दास आहे, माझ्यावर प्रसन्न हो" अशी प्रार्थना केली! ×

शिवभक्ताचा आक्षेप– हरीच्या शक्तीचे स्वकपोलकल्पित वर्णन पुरे कर. आधी हरीचे शरीरच काळे (कृष्ण) आहे हे ध्यानात घे. हरीने पीतांबर नेसला व अंगावर दागीने घातले तरी, त्याचा काळा रंगच उठून दिसतो!

विष्णुभक्ताचे उत्तर– काय म्हणालास? काळा रंग वाईट

---

* ततो हि युद्धाय रमेशशंकरौ व्यवस्थितीं ते धनुषी प्रगृह्य ॥
यतोंतरस्यैष नियामको हरिस्ततो हरोऽग्रेऽस्य शिलोपमोऽभूत् ॥
शशांक नैवाथ यदाभिवीक्षितुं प्रस्पंदितुं वा कुत एव योध्दुं ।
शिवस्तदा देवगणाः समस्तशः शशंसुरुच्यैर्जगतो हरेर्बलम् ॥

–श्रीराम चरित : अ. श्लो.४६–४७

×....अथोत्थितश्चासुरभाववर्जितः क्षमस्व देवेति ननाम पादयोः ।
उवाच च त्वद्वशगोऽस्मि सर्वदा प्रसीद मे त्वद्विषयं मनः कुरु ॥

–श्रीराम चरित : अ. ८, श्लो २२०

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

काय? सुगंधी कस्तुरी काळी असते, मधुर आवाजाचा कोकिळ काळा, पवित्र यमुना नदी काळी आणि उन्नत गजराज काळा असतो. याकरिता हरीचा काळा वर्ण त्याला भूषणावहच होय.

शिवभक्त – ते असो. पण सीतेच्या वियोगामुळे रामाने सामान्य माणसाप्रमाणे शोक केला; भित्र्याप्रमाणे झाडा आड उभे राहून वालीवर बाण सोडून त्याचा वध केला; एक यःकश्चित धोब्याच्या बोलण्यावरून पतिव्रता शिरोमणी सीतादेवीला वनांत पाठविले इत्यादि रामाचे अनेक दोष दाखविता येतील.

कृष्ण तर सांगूनसवरुन जार–चोर! असंख्य गोपीचा प्रियकर आणि सोळा हजार बायका असणारा अतिकामी! त्याच्या आठ पट्टराण्यापैकी बहुतेक पळवून आणलेल्याच !

कृष्णाने धर्मसंस्थापन केले अशी फुशारकी मारतोस; पण कृष्णाचे आप्त व त्याच्या निरंतर सहवासात राहिलेल्या यादवांची उन्मत्तता काय, त्यांचे जगद्विपरीत भांडण काय, कुलनाश काय, व्याधाच्या बाणाने कृष्णाचे मरण काय, सगळेच विपरीत!

राम–कृष्णांच्या वरील व तशाच प्रकारच्या अनेक दोषा-बद्दल तुझे म्हणणे काय?

विष्णुभक्त– असुरांश शिवाचा सेवक, तूं विचारलेल्या साऱ्या प्रश्नांना एकच रामबाण उत्तर देतो, ते ऐक–हरी बद्दल आक्षेप घेणे हेच घोर महापातक असून, आक्षेप घेणाऱ्या तुला अंधतमस् नांवाचा नरक राखून ठेवला आहे. हरीबद्दल संशय घेणारे सारे राक्षस होत. राक्षस कोण याबद्दल विस्ताराने सांगतो ऐक–

रामाने रामेश्वराची स्थापना केली असे म्हणणारा दैत्य.
Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri
रामला वियोगदुःख झाले असे सांगणारा दैत्य.

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कृष्णाने पुत्रप्राप्तीसाठी शिवपूजा केली असे म्हणणारा दैत्य.

राम–कृष्णांना जाऊळ वगैरे मानवी संस्कार केले गेले असे म्हणणारा दैत्य.

राम–कृष्णादि अवतारांना शस्त्रभय सांगणारा राक्षस.

शैवानीं पूजिलेल्या हरीच्या प्रतिमेची सेवा करणारा राक्षस.

शिवाला नमस्कार करणारेही राक्षसच. पण त्यात शिवाच्या अंतर्यायी विष्णूला वंदन करण्याचा उद्देश असला तर दोष नाही.

हरिसर्वोत्तम सिद्धांत मान्य न करणारे शैव सगळेच राक्षस होत. ते पापी दैत्य तमोद्वार नांवाच्या नरकात पडतात ! आणि कल्पाच्या अखेरीस भीम गदाप्रहाराने त्या राक्षसांना ठेचून त्यांच्या लिंग देहाचा नाश करतो. नंतर ते सर्व राक्षस आपले स्वरूपदु:ख अनंत काळापर्यंत भोगत राहतात.

–हरिकथामृतसार, संधि–३०

८) शेवटी, श्री मध्वाचार्य, श्री जयतीर्थ इत्यादि द्वैता–चार्यानीं आणि पुरंदरदास, जगन्नाथदास वगैरे दासवर्यानीं अद्वैताचे व शिवसर्वोत्तमत्व मताचे केव्हांच खंडण करून सोडले आहे! हरिसर्वोत्तमत्व सिद्धांतच सत्य हे ठरून गेले आहे.

पहा–'दुष्ट मताचे खंडण करून हरीच श्रेष्ठ असे जाहीर केले'

–राघवेंद्रराय : १-८

'पांच मुखांचा शिवच श्रेष्ठ' हे वादीचे मत प्रथमच मोडून टाकले

–राघवेंद्रराय : १-२५

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रकरण : ३

देवी, गणेश येहोवा, अल्ला इत्यादि दैवतच सर्वश्रेष्ठ अशी मते

(१) हरी-हरापेक्षा देवीच (सर्व) श्रेष्ठ असे मत

देवीभक्त देवीची सर्वश्रेष्ठता, विशेषतः हरि–हरापेक्षा देवी श्रेष्ठ आहे पुढील कारणानीं सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात :–

शक्ति नसले तर विष्णु, शिवादि देव निर्जीव दगडा–प्रमाणेच होत. त्यांच्यात शक्तिच नसेल तर ते जगाचे रक्षण वगैरे कसे करतील? अर्थात् सर्व देवांच्या मुळाशीं शक्ति आहे. विष्णु आणि शिव हे देवीचे मुख्य भक्त होत. पहा ना, देवासुरांनीं समुद्रमंथन केले तेंव्हा निघालेले अमृत देवांना पाजण्यासाठी, विष्णूला आपले उपास्य स्त्रीरूपच धारण करावे लागले! त्याच–प्रमाणे शिवसुद्धा देवीच्या उपासनेने अर्धनारीनटेश्वर झाला! याप्रमाणे देवी उपास्य आणि हरिहरादि सर्वदेव उपासक आहेत.

शिवभक्त:– प्रकृतिभक्ता, देवीची वढाई काय सांगतोस? कांही झाले तरी देवी शिवाची पत्नीच ना?

देवीभक्त:– मूर्खा, शिव, विष्णु, ब्रह्मा, इंद्र इत्यादि देवांची शक्ति देवीच आहे. म्हणून ती साहजिक शिवापेक्षा श्रेष्ठ होय. याकरिताच दक्षिणेश्वर वगैरे क्षेत्रात 'देवीने आपल्या पायाखाली शिवाला तुडविले आहे' अशा मूर्ती पहावयास मिळतात. ते बाजूला ठेवले तरी, देवीच्या नावाचा जप केल्यामुळेच शंकर आपल्या कंठामध्ये भयंकर हालाहल विष धारण करू शकला, हे तुला माहीत नाहीं काय?

विष्णुभक्त:– अरे शाक्ता, आमचा विष्णु साऱ्या जगाचे संरक्षण करतो. तुझी देवी काय करते? मद्य-मांस सेवन हेच ना?

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

देवीभक्त:–देवीचे महात्म्य न जाणणाऱ्या परम मूर्खा! राजराजेश्वरी देवीनेच रक्षणकार्यासाठी विष्णूला नेमले आहे. विष्णूसारखा काळा धिप्पाड राखणदारावरून देवीचे सर्वेश्वरत्वच सिद्ध होते.

देवीभक्ताचे उद्‌गार असे आहेत :

प्रजेशं रमेशं महेशं, दिनेशं निशीथेश्वर वा कदाचित् ।
न जानामि चान्यं सदाहं शरण्यं, गतिस्त्वं त्वमेका भवानी ।।

–भवान्यष्टक : ६

भावार्थ:– हे भवानी माते, मी ब्रह्मा, विष्णु महेश्वर, सूर्य–इंद्र–चंद्र वगैरे कोणालाही श्रेष्ठ मानत नाही. केवळ तूच माझे सर्वस्व आहेस.

(२) गणेशच सर्वश्रेष्ठ देव असे मत

गणेश मानवांचा, त्याचप्रमाणे देवादिकांचा विघ्नहर्ता आहे. म्हणून अन्य कोणताही देव गणेशापेक्षा श्रेष्ठ म्हणणे केवळ दुरभिमान होय! त्रिपुरदहनाच्यावेळी शिवाने विष्णु, ब्रह्म इत्यादि देवतांच्यासह गणेशाची पूजा केली म्हणूनच तो यशश्वी झाला.

शिवभक्त:– गणेश शिवाचा मुलगा असल्यामुळे, तो सहजच शिवापेक्षा कनिष्ठ ठरतो.

गणेशभक्त:–राम दशरथाचा मुलगा असल्यानें, दशरथापेक्षा तो कनिष्ठ, हे तू मान्य केल्यास, मीही शिवश्रेष्ठतेचा तुझा सिद्धांत मान्य करीन! गणेश शिवाचा पुत्र झाला तो केवळ अवतारासाठी, अन्य कोणत्याही कारणाकरिता नव्हे. गणेशाने जगाला कोणते आश्वासन दिले आहे पहा–

यदा यदा धर्मस्य ग्लानिर्भवति भूतले ।
तदा तदाऽवतारोऽयं गणेशस्य वराननं ।। – परमेश्वर आगम

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भावार्थ–जेंव्हा जेंव्हा पृथ्वीवर धर्म निकृष्टावस्थेला पोचतो, तेंव्हा तेंव्हा गणेशाचा अवतार होतो.

खरोखर, गणेशच सर्वशक्तिमान परमेश्वर असून ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर गणेशाच्या सोंडेतून जन्माला आले! शिवोपासका, ह्यापेक्षाही एक अद्भुत गोष्ट– शिव–पार्वतीनी आपल्या विवाहकाली गणेशाची पूजा केली! ! समजले?

(३) प्राचीन वैदिक देवतांचे सर्वश्रेष्ठत्व

वेदामध्ये ज्यांची स्तुति केली आहे, अशा देवतांबद्दल आता आपण विचार करूया. तेथेही कांहीं देवतांना सर्वश्रेष्ठ म्हणून वर्णिले आहे. पौराणिक देवतांच्या प्राबल्यामुळे आता वैदिक देवता मागे पडल्या असल्या तरी, आपल्या वैभवकाळात आताच्या हरिहराप्रमाणेच त्यानाही सर्वेश्वरत्वाची स्तुति प्राप्त होती, हे वेदसंहितेच्या परीक्षाणाने सहज कळण्यासारखे आहे. असो, सध्या आपण वेदात वर्णिलेल्या मुख्यमुख्य देवतांबद्दल परिशोधन करुया.*

इंद्र–वेदांतील मुख्य देवता इंद्र होय. ऋग्वेदातील एक–चतुर्थांश सूक्ते इंद्राला उद्देशून आहेत. इंद्र देवाधिदेव आहे या अर्थाच्या अनेक ऋचा आहेत.×

"ज्याने पृथ्वीला दृढ उभे केले, पर्वतांना स्थिर केले, ज्याने विशाल अंतरिक्ष निर्माण करून त्याचा ठाव घेतला व स्वर्गाला आधार दिला तो इंद्र."–"घोडे, गाई, रथ आणि जनपद ज्याच्या कह्यात आहेत, ज्याने उषेला व सूर्याला निर्माण केले व नद्याना

* संहितामध्ये अधिक विस्तृत असलेल्या ऋग्वेद संहितेचा आधार येथे घेतला आहे. ऋग्वेद संहितेत एकूण १०२८ सूक्ते आहेत.

× ऋग्वेद : १।१०१।३, ४।३०।१, ७।३०।१, ८।६२।२ इत्यादि

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वाट करून दिली तो इंद्र"..."इंद्र बहुरूपी; आपल्या मायेमुळे वाटेल ते रूप धारण करू शकतो" इत्यादि.

अग्नि–ऋग्वेदात २०० सूक्तानी अग्नीची स्तुति केली आहे. ऋग्वेदाचा प्रारंभ "अग्निमीळे पुरोहितं" या सूक्तातील अग्निस्तवनानेच होतो.

वरुण–"पृथ्वीवर आणि अंतरिक्षात चालणाऱ्या सर्व घटना वरुणाच्या नियमनात असतात. सूर्याला आकाशात स्थापून त्याचा मार्ग आखून देणारा वरुर होय. आकाशात संचार करणारा वायू हा त्याच श्वास. त्याच्या आज्ञेने चंद्र आणि नक्षत्रे प्रकाशतात. सर्व प्राणि आणि देवसुद्धा त्याच्या नियमनाप्रमाणे चालतात, म्हणून त्याचे वर्णन सार्वभौम असे केले आहे. सर्व काहीं त्याच्या अधिकारात आहे" इत्यादि.

ऋग्वेदात सोमाचे वर्णनही पुष्कळ आले आहे, अश्विनी–कुमारची स्तुति ५० सूक्तांनी केली आहे. विष्णूच्या स्तुतीसाठी केवळ ५ सुक्ते, तर रुद्रासाठी फक्त ३ सूक्तेच आहेत!!

वेदकाळात सुद्धा आताप्रमाणेच इंद्र, वरुण, अग्नि इत्यादि देवतांचें उपासक आपापला देवच सर्व श्रेष्ठ असे भांडत होते! ज्ञानदृष्टीचे तेंव्हाचे ऋषि "एकं सद्विप्रा बहुधा वदंति" वगैरे उक्तीच्यायोगें वादाचा समेट घडवून आणीत. ती सुप्रसिद्ध ऋचा अशी आहे–

इंद्र मित्रं वरुणमाग्निमाहु:
अथो दिव्य: स सुपर्णो गरुत्मान् ।
एकं सद्विप्रा बहुधा वंदति
अग्निं यमं मातरिश्वानमाहु: ॥ ऋग्वेद : १।१६४।४६

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

भावार्थ- एका परमेश्वराला ज्ञानी "इंद्र, मित्र, वरुण,

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

अग्नि, वेगाने उडणारा गरुड, वायु" इत्यादि अनेक नावांनी संबोधतात.

वरील श्रुत्याधाराने वेदकालीन सर्वेश्वर देवतांचा परिचय होतो. इंद्र, वरुण इत्यादि देवतांचे भक्त कोणी आज असते तर, त्यानीं वैदिक देवतांवरील पौराणिक हरिहरांचे वर्चस्व कधीच मान्य केले नसते! इंद्रादींच्या भक्तानीं पुराणादि स्मृतीपेक्षा श्रुतीला जास्त प्रामाण्य देणाऱ्या हरिहर भक्तांचे तोंड केव्हाच बंद केले असते!!

(४) ब्रह्मदेवच सर्वश्रेष्ठ असे मत

वेदात ब्रह्मदेवाला हिरण्यगर्भ, प्रजापति इत्यादि श्रेष्ठत्व-दर्शक नांवे आहेत. जगत्कर्तुत्व, देवाधिपत्य वगैरे उन्नत पदावर त्रिमूर्तीच्यापैकी ब्रह्मदेवच प्रथम अभिषिक्त होता. परंतु शिवाच्या व विष्णूच्या भक्तानीं त्याला खाली ओढले, इतकेच नव्हे शिव-भक्तानीं ब्रह्मदेवाला पूजेसही अयोग्य करून ठेवले! असो. पर आपल्याकडे खेड्यापाड्यातून अजूनही ब्रह्मपूजा प्रचलित आहे. कर्नाटकात सामान्य लोक ब्रह्माला हिरोड्या (हिरि वडेय=मोठा मालक), भरमप्पा (ब्रह्मप्पा) या नावाने भजतात. जैन मतियानीं सुद्धा ब्रह्माला देव मानतात व त्याची पुजा, उत्सव वगैरे करतात.

आमच्यातील देवतास्पर्धा साद्यंत पाहिली म्हणजे, मनूच्या काळात वैदिक देवतांचें प्राबल्यच अधिक असून, त्रिमूर्तींच्यापैकी ब्रह्मदेवाचेच तेवढे महत्व होते असे मनुस्मृतीतील श्लोकावरून अनुमान निघते.

एतमेके वदंत्यग्निं मनुमन्ये प्रजापतिम् ।
इंद्रमेके परे प्राणमपरे ब्रह्म शाश्वतम् ।। मनुस्मृति :१२।१२३

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भावार्थ–याला कोणी अग्नि म्हणतात, कोणी मनु तर कोणी प्रजापति म्हणतात. यालाच काहीं जण इंद्र म्हणतात, कांहीं लोक प्राण तर अन्य कोणी शाश्वत ब्रह्म असे संबोधतात.

(५) येहोवा हाच सर्वश्रेष्ठ देव असे मत

यहुदी लोक 'येहोवाच सर्वश्रेष्ठ देव' असे मोठ्या हिरीरीने प्रतिपादन करतात. बायबल (जुना करार) मधील काहीं उताऱ्यावरून ही गोष्ट स्पष्ट होईल–

१. येहोवाशिवाय देव अन्य कोण आहे?
आमच्या देवाशिवाय शरण्य दुसरा कोण? –साम:१८(=Psalms)

२. हे येहोवा! सारे लोक तुलाच साष्टांग प्रणिपात करतात.
...राज्य सर्व येहोवाचेच,
सर्व जनांचा स्वामी तोच आहे. –साम २२

३. येहोवा हाच श्रेष्ठ देव होय;
सर्व देवांचा अधिपति तोच आहे.
ही अगाध भूमि त्याच्या वशात आहे.
पर्वत शिखरेही त्यांचीच आहेत.
त्याने समुद्र निर्माण केला, तो त्याचाच आहे. –साम ९५

४. येहोवा श्रेष्ठ आणि स्तुत्य आहे.
साऱ्या देवामध्ये तोच भयंकर आहे.
लोकांच्या साऱ्या अन्य देवता केवळ बाहुलीच होत.
... ..जनहो, शक्ति प्रभाव येहोवाचेच
त्याचाच प्रभाव असे म्हणून त्याची स्तुति करा. –साम ९६

५. .....देवानो, तुम्हीं सर्वजण
येहोवाला साष्टांग नमस्कार करा. –साम ९७

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

६. समस्त भूनिवासी जनहो,
येहोवाचा जयघोष करा.
येहोवाची संतोषाने सेवा करा.
उत्साहाने जयघोष करीत त्याच्याजवळ या.
येहोवा हाच देव आहे हे जाणून घ्या.
आम्हाला त्यानेच निर्माण केले.
म्हणून आम्हीं त्याचेच आहो. —साम १००

(६) अल्ला हाच सर्वश्रेष्ठ असे मत

महंमदाचे अनुयायी अल्ला हाच जगत्कर्ता परमेश्वर आहे असे ठासून सांगतात. त्यांचा धर्मग्रंथ 'कुराणा'तील काहीं उताऱ्यावरूनच हे स्पष्ट होते—

१. देव एकच आहे.
म्हणा "अल्ला हाच देव आहे."
"अल्लाच्या समान कोणीही नाहीं."

२. अल्लाच्या समान अन्य कोणताही देव नाही. तशा देवता असत्यातर, प्रत्येक देवतेने आपल्या निर्माणकार्याच्या अभिमानाने आपली श्रेष्ठता सिद्ध करण्याकरिता भांडले असते व काहीं देवतांनीं अन्य देवतांचा पराभवही केला असता!

३. मनुष्यमात्रानों ऐका— ज्या देवता अल्लाच्या समान आहेत असे तुम्हीं म्हणता, त्या सर्व देवता मिळून एक माशीसुद्धा निर्माण करू शकत नाहींत. आणि एकाद्या माशीने त्यांच्या एकाद्या वस्तूचे अपहरण केले तर, ती वस्तु त्या देवता परत मिळवू शकत नाहीत! अल्लाशिवाय दुसऱ्या देवता केवळ असमर्थ आहे!

आम्हीं आतापर्यंत विचार केलेल्या हरि, हर देवीपासून

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अल्लापर्यंतच्या देवतांच्या जोडीलाच, सर्वेश्वरत्व पीठावर अधिकार सांगणारे ग्रीकांचा ज्युपिटर, पारशी लोकांचा अहुरमज्द इत्यादि अन्य अनेक देवता आहेत. या सगळ्या देवांच्या असंख्य भक्तांची धर्मवेड पाहिली म्हणजे 'त्यांच्यांतील, कलहाचे घोर युद्धात रूपांतर होणे अपरिहार्य' असे वाटते. तसे पूर्वी अनेकदा धर्माच्या आणि देवाच्या नावाने रक्तपात झाला आहे आणि आताही धर्माच्या बुरख्याखाली, स्वतःच्या देव व धर्माव्यतिरिक्ताच्या साऱ्या मानवकोटीबद्दल द्वेषज्वाला भडकतच आहे! हे असे वर्तन कोणत्याही धर्माच्या किंवा मताच्या तत्त्वाला धरून आहे काय? सगळ्या सर्वेश्वर देवतांचे एकच परमेश्वररूप नसेल काय?

वरील जटिल प्रश्नाचे उत्तर मिळविण्याचा प्रयत्न आम्हीं या ग्रंथाच्या उत्तरार्धात केला आहे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भक्तीसाठी भांडण कां ?

(उत्तरार्ध)

प्रकरण : १

हरि, हर आणि सर्व उपास्यदेवता एक परमेश्वरच

○

हरि–हरांच्या स्वरूपाचा शोध

(शास्त्रप्रणीत हरि–हरभक्तीच्या स्तोत्र–मंत्रादिकांच्या परीक्षणानें)

उपोद्घात–आपण प्रथम (उत्तरार्धाच्या १ ल्या प्रकरणांत) शास्त्रसंमत हरि-हरभक्तीच्या स्तोत्र-मंत्रादिकांचे परिशीलन करून, त्या देवेशांचे खरे स्वरूप साहचर्याने जाणून घेऊ आणि मग (२ऱ्या प्रकरणांत) हरभक्त व हरिभक्त यांच्या भावप्रधान भक्तिसाधनांच्या परीक्षणाने, त्या अधिदेव–तांच्या स्वरूपाचे सत्य ज्ञान मिळवू.

श्रेष्ठ शिवभक्त उपासना करीत असलेल्या शिवाचे आणि परम विष्णु-भक्त उपासना करीत असलेल्या विष्णूचे आणि स्वरूप कोणते हे त्यांच्या अभिमतानेच समजून घेऊ. आम्हीं प्रस्तुत विचार करताना "परमेश्वर जागचा उत्पत्ति-स्थिति–लयकर्ता, सर्वज्ञ, सर्वव्यापक आणि प्राणिमात्रांच्या हृदयात राहणारा अंतर्यामी आहे" ही व्याख्या गृहीत धरली आहे. "परमेश्वराचे खरे स्वरूप सृष्टिकर्तृत्वादी गुणसंबंध नसलेले सच्चिदानंद परब्रह्म आहे" असे कित्येक ज्ञानी संतानीं सांगितले असले तरी, सध्या ते आम्हीं विचारात घेत नाहीं. कारण, आमची जिज्ञासा सगुण परमेश्वरा-बद्दलच असून, निर्गुण ब्रह्माचे ज्ञान सध्याच्या आमच्या विचारकक्षेच्या बाहेर आहे. असो. आता आपण हरि–हरभक्तांच्या प्रमाण ग्रंथांमध्ये सांगितलेल्या पूजामंत्रादिकांचे अवलोकन करून हरि–हराचे स्वरूप जाणूया.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

रुद्र व पुरुषसूक्त यांच्या परीक्षणाने शिव-विष्णूच्या स्वरूपशोध

१) प्रथम शिवक्षेत्रांचे आणि तेथील पूजाप्रकाराचे अवलोकन करू. भारतात हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत हजारो प्राचीन शिवक्षेत्रे आहेत. त्यामधील सुप्रसिद्ध क्षेत्रांचा येथे उल्लेख करीत आहो–

काशी, रामेश्वर, श्रीशैल, उज्जयिनी इत्यादि क्षेत्रातील १२ ज्योतिर्लिंग,

चिदंबर, कांची, अरुणाचल इत्यादि क्षेंत्रातील ५ आकाशादि लिंगे,

हंपी, गोकर्ण, भुवनेश्वर (ओरिसा) व. व.

या शिवक्षेत्रातील भव्य मंदिरात विविध आकाराची लिंगे असून, त्यांना वेगवेगळी ईश्वरनामे आहेत. ह्या व दुसऱ्या असंख्य क्षेत्रातील लिंगार्चन कसे चालते व तेथील पूजामंत्र कोणते याचे निरीक्षण केल्यास, त्या सर्व ठिकाणी रुद्राभिषेक करणे हाच मुख्य पूजाभाग असल्याचे दिसून येते. रुद्राची ११ आवर्तने १२१ आवर्तने करण्याच्या प्रघातापासून रुद्राचे महत्व कळते. यात्रिकाने कोणत्याही शिवक्षेत्रात करण्याच्या देवकार्यात रुद्राभिषेक हाच मुख्य भाग असतो. बदरी केदारापासून रामेश्वरापर्यंत असलेल्या लक्षावधि शिवालयामध्ये, अति प्राचीन कालापासून आजपर्यंत स्वरबद्धतेने घोष होत असलेल्या रुद्रमंत्रांचे आता परिशीलन करुया.

रुद्राध्यायातील रुद्र किंवा शिव हा सर्वात्मक परमेश्वर होय; **तो सर्व रूपाने सर्वत्र भरून राहिला आहे** असे विस्ताराने वर्णन केले आहे. उदाहरणासाठीं आम्हीं कांहीं ऋचा अर्थासह खाली देत आहोः–

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

अनुवाक–३

मंत्र	अर्थ
नमः सहमानाय निव्याधिन आव्याधिनीनां पतये नमः ।	चढाई करून शत्रूला, घायाळ करणाऱ्याला नमस्कार. सर्व बाजूनी आघात करणाऱ्या शूराच्या अधिपतीला नमस्कार.
नमः ककुभाय निषंगिणे स्तेनानां पतये नमः ।	उच्चासनावर बसणाऱ्या व बाणांचा भाता धारण करणाऱ्याला नमस्कार असो. कपटी लोकांच्या स्वामीला नमस्कार असो.
नमः वंचते परिवंचते स्तायूनां पतये नमः	फसवणाऱ्याना, लुबाडणाऱ्याना व कपटी लोकांच्या स्वामीला नमस्कार असो.
नमः आसीनेभ्यः शयानेभ्यश्च वो नमः	वसणाऱ्याना नमस्कार, निजणाऱ्याना नमस्कार
नमः स्वपद्भ्यो जाग्रद्भ्यश्च वो नमोः	झोपलेल्यांना नमस्कार, जागे असणाऱ्यांना नमस्कार.
नमस्तिष्ठद्भ्यो धावद्भ्यश्च वो नमः	उभे असणाऱ्यांना नमस्कार व धावणाऱ्यांना नमस्कार.
नमः सभाभ्यः सभापतिभ्यश्च वो नमः ।	सभांना नमस्कार व सभापतिना नमस्कार.

अनुवाक–७

नमो दुंदुभ्याय चाऽऽहनन्याय च ।	दुंदुभीच्या ठिकाणी आणि टिपऱ्यात असणाऱ्याला नमस्कार.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

नमः स्रुत्यायच नमः पथ्याय च ।	पाऊलवाटेने जाणाऱ्याला व रस्त्याने जाणाऱ्याला नमस्कार.
नमो नाद्याय वैशंताय च ।	नदीत असणाऱ्याला व तळ्यात असणाऱ्याला नमस्कार.
नमः कूप्याय चावट्याय च	विहिरीत असणाऱ्याला व खळग्यातील पाण्यात असणाऱ्याला नमस्कार.

अनुवाक–९

नमो गोष्ठ्याय च गृह्याय च ।	गोठ्यात रहाणाऱ्याला व घरात रहाणाऱ्याला नमस्कार.
नमस्तल्पाय च गेह्याय च ।	शय्येवर असलेल्यास व घरकुलात असणाऱ्याला नमस्कार.
नमः पांसव्याय च रजस्याय च ।	सूक्ष्म रजःकरणात असणाऱ्याला व धूळीत असणाऱ्याला नमस्कार.
नमः पर्णाय च पर्णशद्याय च ।	पानाचे ठिकाणी असणाऱ्यास व शुष्क पर्णराशीत असणाऱ्यास नमस्कार.

उपरिनिर्दिष्ट थोड्याच मंत्रावरूनही हेच सिद्ध होते की, शिवभक्त अत्यंत भक्तीने स्वरपूर्वक म्हणत असलेले रुद्रमंत्र शिवाची सर्वात्मकता सांगतात. **"समोरचे शिवलिंग एवढाच शिव नसून, भुवनत्रयात सर्वत्र शिव भरून राहिला आहे"** हेच रुद्राध्यायाचे तत्त्व आहे.

आता प्रसिद्ध विष्णुक्षेत्रे आणि तेथील पूजापद्धति यांचे अवलोकन करूया. विष्णूच्या अवतारमालिकेतील राम–कृष्णांची

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

 CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अनेक सुप्रसिद्ध क्षेत्रे भारतात सर्वत्र असून, तेथे मोठ्या वैभवाने पूजा, उत्सवादि होत असतात. पंढरपूरचा विठ्ठल, पुरीचा जगन्नाथ, गिरीचा वेंकटेश, द्वारकेचा कृष्ण, उडपीचा कृष्ण, कांचीचा वरदराज इत्यादि क्षेत्रदेवतांचा निर्देश इथे करता येईल. शिवाय भरतभूमीत राम-कृष्णांची मंदिरे असंख्यात आहेत. असो. प्रस्तुत विष्णु (राम किंवा कृष्ण) पूजेच्या वेळी म्हणत असलेल्या मंत्रांचे निरीक्षण करूया. सांगोपांग विष्णुपूजेंतील महत्वाचा उपचार म्हणजे अभिषेक होय. तसे अभिषेक करताना पुरुष-सूक्ताचे मंत्र म्हणतात. दुसरा प्रकार म्हणजे हरीची षोडशोपचार पूजा करताना, आवाहनादि सोळा उपचारांचे वेळी पुरुषसूक्ताला सोळा ऋचा म्हणतात. याप्रमाणे विष्णुभक्तीमध्ये पुरुषसूक्ताला महत्वाचे स्थान आहे. ह्या पुरुषसूक्ताच्या अर्थावरून विष्णुस्वरूप निर्णयाला मदत होईल.

आतां पुरुषसूक्ताचा थोडक्यात अर्थ– परमात्म्याला अनंत शीर्षे अनंत डोळे, अनंत पाय आहेत. भूत, भविष्य आणि वर्तमान प्रपंच सर्व तोच आहे. हा महिमा सुद्धा परमात्म्याच्या अगाध महिम्याचा अल्पांश मात्र होय! ....

मूर्तीची पूजा करीत असतानाच "सहस्रशीर्षा सहस्राक्षः सहस्रपात्" इत्यादि पुरुषसूक्त म्हणतात, त्या अर्थी **विष्णु केवळ मर्ति नसून तो विराटरूपी, अनंत महिमायुक्त आहे हे विष्णुभक्ती-तील अर्चनावरून सहज कळते.**

(२) शत, अष्टोत्तरशत आणि सहस्रनामे

शिवभक्त शिवाचा महिमा वर्णन करणारी शत-अष्टोत्तर-शत-सहस्रनामावली आणि विष्णुभक्त विष्णुचा महिमा वर्णन

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

करणारी शत-अष्टोत्तरशत-सहस्रनामावली अनन्य भक्तीने पठण करतात. पूजेच्या वेळी, अभिषेक करताना किंवा क्षेत्रात कुंकुमार्चन करतेवेळी ह्या नामावली म्हणतात. एकाच तऱ्हेच्या या नामावलीत शिवाचे व विष्णूचे कसे वर्णन केले आहे, ते तुलनात्मक रीतीने पाहूया. आपण येथे स्कंद पुराणातील शिवाष्टोत्तरशतनामस्तोत्र व विष्णुपुराणातील विष्णुशतनामस्तोत्र अवलोकनासाठी घेऊ--

शिवाष्टोत्तरशतनामस्तोत्र (१७ श्लोकी)	**विष्णुशतनामस्तोत्र** (१५ श्लोकी)
सर्व देवतानी केलेले शिवस्तुति	नारदाने केलेली विष्णुस्तुति

तीच नामे–

ईश्वर, सर्वेश, सर्वज्ञ प्रभु	ईश्वर, सर्वेश, सर्वज्ञ, त्रिकालज्ञ, प्रभु

समान नामे–

१ देवदेव, महादेव, देवतेश	**देव**
२. त्रिलोकेश	**भुवनेश्वर, सर्वभूतानां ईश्वर**
३. रुद्र, भीमेश	**रौद्र, भीम**
४. अनघ	**मंगल, कुशल**
५. महावीर्य, महाबल	**दुष्टमर्दन.**
६. विभु, निःसंग, स्थाणु इ.	**अव्यक्त, शाश्वत, अज अव्यय इ.**
उरलेली नावे शिवाचे रूप, वेष, चरित्र इत्यादि दर्शवितात.	उरलेली नावे विष्णूचे रूप, वस्त्राभरण, चरित्र इत्यादि दर्शवितात.

वरील दोनी नामावलींच्या परीक्षणाने सहजच लक्षात येते की 'शिवभक्त, शिवाच्या रूपादि वर्णना बरोबरच तो देवाधिदेव, त्रिलोकेश, सर्वज्ञ, विभु आहे असे शिवाच्या परमेश्वरत्वाचे

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वर्णन करतात आणि विष्णुभक्तही विष्णूच्या रूपादि वर्णना बरोबरच तो भुवनेश्वर, सर्वेश, अव्यय, शाश्वत आहे, असे विष्णूच्या परमेश्वरत्वाचे वर्णन करतात.

(३) 'कवच', 'पंजर' आणि 'रक्षा'

इष्ट देवता आपले रक्षण करो या उद्देशाने प्रत्येक भक्त देवाचे 'कवच', 'पंजर', 'रक्षा' इत्यादि नावांनी प्रचलित असलेल्या स्तोत्रांचे पठण करतो. ह्या स्तोत्रांत आपल्या देवाला निर-निराळ्या नावांनी संबोधन करून, त्या त्या नांवाचा देव आपल्या देहाच्या विशिष्ट अवयवांचे रक्षण करो, विशिष्ट दिशेकडून रक्षण करो अथवा विशिष्ट संकटापासून रक्षण करो अशा प्रकारची प्रार्थना असते, येथें आम्हीं शिवकवच व विष्णुपंजर आणि शिवरक्षा व रामरक्षा या स्तोत्रांचे निरीक्षण करून, हरि-हरांच्या स्वरूपज्ञानाविषयी काय उपलब्ध होईल यांचा शोध घेऊ.

शिवकवचामध्ये प्रारंभी शिवाच्या परमेश्वर रूपाचे ध्यान करण्यास सांगितले आहे. ध्यान श्लोकात "विश्वव्यापी, हृदय कमलात राहणारा, अतींद्रिय, सूक्ष्म, अनंत आणि परमानंदमय अशा शिवाचे ध्यान करावे" असे म्हटले आहे. **-शिवकवच, श्लो.२-३**

त्याचप्रमाणे रक्षणाप्रार्थनेच्या आधीही "अखिल देवतांचा आत्मा, ज्योतिर्मय, आनंदघन, चिदात्मा आणि सर्वशक्त ईश्वर सर्व भयापासून माझे रक्षण करो" याप्रमाणे शिवाचे परमेश्वरत्व अनुलक्षिले आहे.

आंता, विष्णूपंजर स्तोत्राच्या प्रारंभीही ध्यान-श्लोकात विष्णूच्या परमेश्वर स्वरूपाचे असे वर्णन आहे- "प्रकृतीच्या पलीकडे असणारा, अनादि, अद्वितीय, बहुविध गृहेत राहणारा

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

सर्वांचा आधार, सर्व व्यापक आणि जगाचा नाथ असलेल्या विष्णूस मी नमस्कार करतो" व पंजराच्या शेवटी सुद्धा "जलात विष्णु, स्थलात विष्णु, पर्वत-शिखरावर विष्णु, ज्वालामालामध्ये विष्णु—याप्रमाणे सारे जग विष्णुमय आहे" असा उपसंहार आहे.

यानंतर शिवरक्षा व रामरक्षा या स्तोत्रात अत्यंत साम्य आहे हे पुढील तुलनेवरून समजेल—

शिवरक्षा	रामरक्षा
नारायणाने याज्ञवल्क्य ऋषीस स्वप्नांत सांगितले, ते त्याने उठताच लिहून ठेवले.	शंकराने बुधकौशिक ऋषीस स्वप्नांत सांगितले, ते त्याने उठताच लिहून ठेवले.
श्लोक २१	—श्लोक १५
शंकर डोके, कपाळ, डोळे, बाहु, हृदय, पाय याप्रमाणे सर्वांगाचे रक्षण करो.	राम डोके, कपाळ, डोळे, बाहु, हृदय, पाय याप्रमाणे सर्वांगाचे रक्षण करो.
श्लोक ३ ८	—श्लोक ४—९
शिवसामर्थ्याने युक्त अशा या कवचाचे पठण करणाऱ्याला इहलोकी सुखभोग व शेवटी शिवसायुज्याची प्राप्ति होते .. शिवनामाने सुरक्षित असलेल्या शिवभक्तास पाहून भूतपिशाचादिक पळून जातात. तीनही लोक त्याला वश होतात.	रामसामर्थ्याने युक्त अशा या रक्षाचे पठण करणारा विजयी आणि गुणसंपन्न होतो... .... रामनामाने सुरक्षित असलेल्या भक्ताकडे भूत-पिशाचादिक बघूही शकत नाहीत त्याला सर्व सिद्धि हस्तगत होतात.
श्लोक ९-११	—श्लोक १०—१३

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

(४) महिम्न स्तोत्रे

शिवाच्या सर्वश्रेष्ठत्वाचे वर्णन करणारे शिवमहिम्न प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे विष्णुमहिम्न स्तोत्र विष्णूच्या सर्वश्रेष्ठतेचे वर्णन करते. ही दोनही महिम्ने शिवविष्णूंच्या परमेश्वरत्वाचे यथायोग्य वर्णन करतात यात संशय नाहीं. विस्तारभयास्तव आम्हीं त्या दोनही स्तोत्रांतील दोन दोन श्लोक अर्थासह खाली देत आहो–

त्रयी सांख्यं योगः पशुपतिमतं वैष्णवमिति
प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति च ।
रुचीनां वैचित्र्याद् -ऋजुकुटिल नानापथजुषां
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इति ।। शिवमहिम्न श्लोक.७

भावार्थ–कर्म, सांख्य, योग, शैव, वैष्णव इत्यादि वेगवेगळ्या मतामध्ये "अमुक श्रेष्ठ, तमुक हितकर" असे आपापल्या आवडी–निवडी प्रमाणे, सरळ वक्र इत्यादि अनेक मार्गांनी जाणाऱ्या सर्व मतीयांना, जलप्रवाहांना अखेरचा आश्रय समुद्र असतो, त्याप्रमाणे तूच अंतिम स्थान आहेस.

याला समानार्थक विष्णुमहिम्नातील श्लोक असा–

यदाहुर्ब्रह्मैके पुरुषमितरे कर्म च परे
परे बुद्धं चान्ये शिवमिति च धातारमपरे ।
तथा शक्तिं केचिद्गणपतिमुतार्कं च सुधियो ।
मतीनां वै भेदात्त्वमसि तदशेषं मम मतिः।। –विष्णुमहिम्न, श्लोक२

भावार्थ–काहीं जण (तुला) ब्रह्म असे म्हणतात. तर अन्य कोणी पुरुष किंवा कर्म म्हणतात. काहीं जण बुद्ध किंवा शिव म्हणतात, तर अन्य कोणी प्रजापति किंवा शक्ति म्हणतात. काही जण गणपति म्हणतात, तर अन्य कोणी सूर्य म्हणतात.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

या प्रमाणे शहाणे लोक आपल्या बुद्धिवैचित्र्यामुळे जे जे म्हणतात ते ते सर्व तूच आहेस असा माझा निश्चय आहे.

परमेश्वराच्या अनंतानंत गुणांचे वर्णन शिवमहिम्नात पुढीलप्रमाणे आहे–

असितगिरिसमं स्यात्कज्जलं सिंधुपात्रे
सुरतरुवरशाखा लेखनी पत्रमुर्वी ।
लिखति यदि गृहीत्वा शारदा सार्वकालं
तदपि तव गुणानामीश पारं न याति ।। शिवमहिम्नः-श्लोक ३५

भावार्थ– काळचा पर्वताएवढे काजळ समुद्ररूपी पात्रात घालून शाई तयार करून आणि कल्पवृक्षांच्या शाखेची लेखणी बनवून पृथ्वीरूपी कागदावर सरस्वती सर्व काळ लिहीत बसली तरी ईश्वरा, तुझ्या गुणाचे पूर्ण वर्णन होऊ शकत नाहीं!

याचप्रमाणे विष्णुरूपी परमेश्वराच्या असंख्य गुणांचे वर्णन करणारा विष्णुमहिम्नातील समान श्लोक असा–

कणान्काश्चिद्-वृष्टेर्गणननिपुणस्तूर्णमवने:
तथाऽशेषान्पांसूनपि च कलयेच्चापि तु जनः ।
नभः पिंडीकुर्यादचिरमपि चेत्-चर्मवदिदं
तथापीशासौ ते कलयितुमलं नाखिलगुणान्।। विष्णुमहिम्नःश्लोक-१३

भावार्थ– कुशल गणक एखादे वेळेस पावसाचे थेंब त्वरेने मोजूही शकेल किंवा पृथ्वीवरील सर्व धूलीकणांची मोजदादही करू शकेल; अथवा कोणी एखादे वेळेस आकाश चर्माप्रमाणे गुंडाळेलही, परंतु, हे ईशा, तुझ्या सर्व गुणांचे आकलन कोणी करू शकणार नाहीं!

गीता (५)

कृष्णानें उपदेशिलेली भगवद्‌गीता जगप्रसिद्ध असल्यामुळे

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तिची महती वेगळी सांगण्याची गरज नाहीं. त्याचप्रमाणे शिवगीताही महत्वाची आहे. देवाच्या मुखातून स्रविलेल्या बोधामृतरूपी गीतांचे पठण व अध्ययन भक्तांना मोक्षसाधन असल्यास नवल नाहीं. प्रस्तुत आम्हीं भगवद्गीता आणि शिव-गीता यांतील विषय परीक्षणाच्या खोल पाण्यांत न शिरता, दोनही गीतांमधील केवळ विषय साम्य दाखविणार आहोत-

शिवगीता	**भगवद्गीता**
पद्मपुराणांत शिवाने रामाला उपदेश केला आहे.	महाभारतात कृष्णाने अर्जुनाला उपदेश केला आहे.
प्रत्येक अध्यायाच्या शेवटी 'इति श्री शिवगीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यांयां योगशास्त्रे... ...' असा उल्लेख आढळतो.	प्रत्येक अध्यायाच्या शेवटी 'इति श्रीमद् भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे .... ' असा उल्लेख आढळतो.
'भक्तियोग', विभूतिकथन', 'विश्वरूपदर्शन' या नावांचे अध्याय आहेत.	'भक्तियोग,' विभूतियोग' 'विश्वरूपदर्शनयोग' या नावांचे अध्याय आहेत.

दोनही गीतांतील विभूति बहुधा सारख्याच असून विश्व-रूपदर्शनही एकाच प्रकारचे आहे. भक्तिसाधनेही समान असून विष्णुगीता (भगवद्गीतां) आणि शिवगीतां पुष्कळ बाबतीत एकरूप आहेत.

आक्षेप–भगवद्गीता आणि शिवगीतां यांच्यातील सादृश्याचे कारण भगवद्गीतेनुसार शिवगीतेची रचना झाली हे असून, तुम्हीं म्हटल्याप्रमाणे शिव-विष्णूचे समानत्व नव्हे.

उत्तर– एका भक्तिमार्गातील एकाद्या असदृश कृतीप्रमाणे अन्य भक्तिमार्गातील प्रतिकृतींची रचना होते यात संशय नाही.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

उदाहरणार्थ भगवद्‌गीतेप्रमाणे शिवगीता, गणेशगीता इत्यादि. शिवमहिम्नाप्रमाणे विष्णुमहिम्न, देवीमहिम्न, गणेशमहिम्न इत्यादि. या प्रतिकृतींत मूल कृतीतील देवताप्रमाणेच आपल्या देवताचे वर्णन करतात. या वरून त्या दोनी देवतांचे स्वरूपसाम्यच सिद्ध होते. नाहींतर केवळ रचनाकौशल्यासाठी आपल्या देवाचे स्वरूप अन्यथा करणे कोणालाही आवडले नसते.

आतापर्यंत शास्त्रोक्त भक्तिक्रमाचे अवलोकन करून, त्या त्या देवभक्तांच्या रीतीनेच आपण हरि-हरांचे स्वरूप पाहिले. या सर्व संशोधनातूनच काय निष्पन्न झाले तर "शिव पंचमुखी, त्रिशूलधारी, जटेत गंगा धारण करणारा, पार्वतीपति, नीलकंठ याप्रमाणे सगुण साकार आहे" असा शिवभक्तांचा दृढ विश्वास असला तरी **तो (शिव) जगत्कर्ता, सर्वज्ञ, सर्वव्यापक, सर्वांचा अंतर्यामी, अनंतगुणपरिपूर्ण परमेश्वर** आहे, अशी त्यांची मुख्यत्वे करून भावना असते. त्याचप्रमाणे विष्णु चतुर्भुज, शंख-चक्र-गदा-पद्मधारी, श्रीवत्स-कौस्तुभादिकांनी अलंकृत, लक्ष्मीपति, गरुडवाहन असा सगुण साकार आहे असे विष्णुभक्त समजत असले तरी, **तो (विष्णु) सृष्टिकर्ता, सर्वज्ञ सर्व जीवांचा अंतर्यामी, अमितगुणपरिपूर्ण परमेश्वर** आहे, अशी त्यांची दृढ श्रद्धा असते. आम्हीं परीक्षण केलेल्या 'रुद्रमंत्र-पुरुषसूक्त, इत्यादि नामावली, कवच इ., महिम्न आणि गीता' यावरून हीच गोष्ट सिद्ध झाली आहे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रकरण : २

हरिहरांचा स्वरूप शोध (पुढे चालू)

(शिवभक्त आणि विष्णुभक्त यांच्या भावनात्मक भक्तीच्या परीक्षणाने)

(१) नामस्मरणाचें महत्व

शिवभक्तानीं आपल्या पद–पद्यांत आणि वचनांमध्ये शिवनामस्मरणाचा महिमा बहुपरीने वर्णन केले आहे :–
शिवनामस्मरणाने पंचमहापातकादि सकल पापांचा नाश होतो, अगणित पुण्यसंचय होतो, शिवसायुज्य प्राप्त होते इ. इ. त्याचप्रमाणे विष्णुभक्तानीं विष्णु–राम–कृष्ण यांच्या नामस्मरणाचे माहात्म्य मुक्त कंठाने वर्णिले आहे. विविध अंकितांच्या दासवर्यानीं गायिलेले नाममहात्म्याचे पदवाङमय खरोखर स्फूर्तिदायक आहे. एवंच हरि–हर––भक्तानीं वर्णिलेला नाममहिमा भक्तिमंदिराचा पाया असे म्हणता येईल. सुप्रसिद्ध शिवभक्त आणि विष्णुभक्त यांच्या बरोबर आपणही आता नामकथामृताचे सेवन करूया–

वसंवेश्वर म्हणतात–"हत्ती अंकुशाला भीतो, पर्वत वज्रायुधाला भीतो, अंधार दिव्याला भीतो त्याप्रमाणे पंचमहापातके शिवनामाला भीतात."

निजगुण शिवयोगी म्हणतात–"सर्व जीवांना शिवमंत्र हाच मोक्षोपाय आहे. कोणीही 'शिवाय नमः' या पंचाक्षरी मंत्रांचा उच्चार एकदा केल्यास पुरे, त्याच्या सर्व पापांचा नाश होतो."

मुप्पिन षडक्षरी म्हणतात–"संजीवनी औषध असताना मरणास कां भ्यावे? घरात परीस असताना दारिद्र्याला कां भ्यावे? तसे जिभेवर शिवपंचाक्षरी मंत्र असताना पूर्व पापाला कां भ्यावे? अमृतसमुद्राच्या तीरावर असणाऱ्याला भुकेचे भय असते कां?

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

सूर्योदय झाल्यावर अंधाराचे भय राहील काय? अग्नीजवळ वसलेल्याला थंडीचे भय असते कां........."

पुरंदरदासानीं गायिले आहे "गोविंदाचे एकच नाम सर्व सिद्धिप्रद आहे. कोणत्याही गोष्टीस एक नामच बस्स आहे! नामस्मरण करणारानें कितीही पाप केले असले, प्राणहत्या केली असली किंवा दुष्कृत्ये केलीं असली तरी त्याचे काय? अजामीळाचा उद्धार करणारे नाम त्या पाप्यालाही पापमुक्त करील. एवढेच नव्हे तर पृथ्वीवरील सकल तीर्थक्षेत्राची यात्रा केल्याचे फळ विठ्ठलाच्या नामस्मरणाने प्राप्त होते."

परमात्म्याचे माहात्म्य वर्णन करणारे सारे वेद एकाच नामात समावले आहेत! महा महिमाशाली एकाच नामाने प्रल्हादाचे रक्षण केले नां? त्याच एका नामानें अजामीळाचा उद्धार केला नां? ध्रुवाला चिर पदवी दिली नां?........"

"कृष्णनामरूपी खडीसाखर घ्यारे! ह्या नाम–खडीसाखरेची गोडी जाणणारेच जाणतात! ही खडीसाखर पोत्यात खच्चून भरावयाची नाहीं व बाजारात जाऊन विकण्याचाही श्रम नको; हिला नेण्यास भाडे लागत नाहीं, किंवा कोठे जकातही द्यावी लागत नाहीं! भक्तजण नेहमी ज्या विठ्ठल नामाची गोडी चाख–तात, ती नामरूपी खडीसाखर घ्या हो घ्या!"

सर्व श्रेष्ठ भक्तानीं नामस्मरणाचा अनंत महिमा जनमना–कर्षक अनेक पदद्यरूपानें वर्णिला आहे. त्यापैकी कांहींचा केवळ अल्प निर्देश वर केला आहे.

(२) सर्वावयवांनीं व मनाने भक्ती

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

जिभेने नामस्मरण करावे, त्याचप्रमाणे डोळ्यांनी देवाचे

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

रूप पहावे, कानानें देवाचा महिमा श्रवण करावा व मनाने नेहमी देवाचे चिंतन करावे, याप्रकारचे भक्तीचे आचरण शिवभक्तानीं आणि विष्णुभक्तानींही प्रेमाने वर्णिले आहे. उदा– बसवेश्वरानीं "माझ्या वाचेंमध्ये तुझे नामामृत भरून राहो, माझ्या डोळ्यांत तुझे रूप भरून राहो, माझ्या कानांत तुझे कीर्तिश्रवण भरून राहो, माझ्या मनात तुझी आठवण भरूण राहो आणि मी तुझ्यामध्ये भरून राहो" अशी प्रार्थना केली आहे.

पुरंदरदासही अशीच विनवणी करतात– "हे हरे! मी तुझ्याकडे अधिक कांही मागत नाही, तर माझ्यावर एवढीच दया कर. माझे शिर तुझ्या चरणकमलावर झुको, माझे डोळे तुलाच पाहोत, माझे हात तुझी पूजा करोत व माझे मन निरंतर तुझे ध्यान करो."

जिभेने नामस्मरण भक्ति, कानानीं श्रवण भक्ति, हातांनी अर्चन भक्ति, सर्वांगाने नाचत-डोलत कीर्तन भक्ति याप्रमाणे भक्तीचे आचरण करावे, असा उपदेश सर्व हरि-हरभक्तवर्यांनीं केला आहे व त्याप्रमाणे भक्ती करून ते स्वतः धन्य झाले आहेत. तसेच त्यानीं वात्सल्य भक्ती, दास्य भक्ति, सख्य भक्ति मधुरा-भक्ति इ. श्रेष्ठ भक्तिसाधनांचेही एकाच तऱ्हेने वर्णन केले आहे.

(३) देवाच्या रूपदर्शनाची आस

अर्चन, श्रवण, नामस्मरण कीर्तनादि भक्ति अनन्य भावे करीत करीत असता, भक्ताच्या मनांत सहजच देवाच्या साक्षात्काराची (रूपदर्शनाची) इच्छा निर्माण होते. तो सतत देवाला शरण जाऊन प्रत्यक्ष प्रकट होण्याबद्दल प्रार्थना करू लागतो. त्यावेळेस भक्त तहान भूक, झोप इत्यादि कशाचीही

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पर्वा न करता, एकाग्रतेने देवाचे चिंतन करीत असतो. देव लवकर दर्शन देत नाहीं म्हणून तो व्याकूळ होतो. "देवा, तू माझ्यावर केव्हां प्रसन्न होशील? पूर्वी तू अनेक भक्तानां प्रत्यक्ष दर्शन दिले, तर माझ्यावर कां दया करीत नाहींस?" इत्यादि देवाचा धावा करतो.

आपल्या उपास्य देवाचे स्वरूप भक्ताला पुराण स्तोत्रांतून आणि भक्तश्रेष्ठानीं केलेल्या रूपवर्णनावरून आधीच माहीत असते म्हणून दर्शनासाठी आतुर झालेला भक्त आपल्या देवाचे रूप, त्याचे वेष, व अलंकार, त्यांची आयुधे ध्वज, वाहन, पत्नी, पुत्र इत्यादि परिवार यांचे मोहकतेने वर्णन करतो. देवाचे मुख-सौंदर्य, तेजःपुंजता, त्यांचे आकर्षक रूप, त्यांच्या पायाचा महिमा इत्यादिकांचे तो भक्त्यातिशयाने गातो. अशा प्रकारच्या काहीं भक्तिगीतांचे अवलोकन करूया.–

अक्कमहादेवी– आपल्या मैत्रिणींना अशी विनंति करते– "चमकणाऱ्या जटेवर चंद्रकोर धारण केली आहे, कानांत सर्प-कुडले घातली आहेत, ज्यांच्या गळचात रूंडमाळा आहे अशा देवाला तुम्हीं कोठेतरी पाहिल्यास, त्याला मजकडे येण्यास सांगा बरे!"

अखंडेश्वर म्हणतात– "आमच्या शिवाचे रूप कसे आहे ते ऐका–त्यांच्या डोक्यावर तळपणाऱ्या लालसर जटा आहेत. यांच्या कपाळावर अग्निनेत्र शोभून दिसतो! त्यांच्या डोळचात दृष्टि आहे, चेहऱ्यावर मंदस्मित विलसते! लाल ओठ रत्नाप्रमाणे चमकत आहे. याप्रमाणे सौंदर्ययुक्त आमचा अखंडेश्वर कोटि सूर्यांच्या तेजाने शोभतो !!"

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

मुप्पिन षडक्षरी– अशी इच्छा व्यक्त करतात–"बालचंद्राला

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

शिरावर धारण करणाऱ्या, सापांचे भूषण असणाऱ्या, व्याघ्रचर्म नेसून गजचर्म पांघरणाऱ्या आणि मृदु हसणाऱ्या शिवरूपामध्ये मी कधी बरे तन्मय होईन!"

पुरंदरदास कृष्णाचा असा धावा करतात– "कृष्णा, यदुकुलनंदना, माधवा मजकडे ये. हातांत शंख–चक्र धारण करणाऱ्या गोपाळा ये. गरुड वाहना, तऱ्हेतऱ्हेचे रूप धारण करणाऱ्या हसन्मुख राजा लवकर ये. विठ्ठला मी जगाला तुझा महिमा सांगत आहे, माझ्याकडे लवकर धाव घे."

परंदरदासानीच अन्यत्र कृष्णरूपाचे असे सुरेख वर्णन केले आहे–"सुंदर कृष्णमूर्ति माझ्या डोळ्यापुढे उभी आहे. अहाहा! कृष्ण सौंदर्याचे मी कसे वर्णन करू? त्यांच्या डोक्यावर रत्नाचा मुकुट आहे, कपाळावर कस्तुरीतिलक आहे, मधुर आवाजाने मुरली वाजवीत तो तिरप्या नजरेने पहात आहे! त्यांच्या वक्षावर कौस्तुभमणि झळकत आहे. पीतांबर नेसलेला आणि सर्वांगावर अलंकार घातलेला विठ्ठल माझ्यावर प्रसन्न झाला आहे!"

देव आपल्या घरी आला भावनेने पुरंदरदास किती उल्हासाने वर्णन करतात पहा–"अहाहा! माझे भाग्य उजळले! देवांचा देव, देवशिखामणी असा माझा स्वामी घरी आला! शेषावर शयन करणारा, गरुडावर बसून संचार करणारा आला! अर्जुनाला प्रसन्न झालेला नारायण माझे घरी आला ! मगरीस ठार करून गजेंद्राचा उद्धार करणारा आला ! अक्रूरावर दया करणारा आला ! वेदवेद्य आला ! नित्यतृप्त आला ! हसन्मुख विठ्ठल आज माझे घरी आला! !"

वर सांगितल्याप्रमाणे शिवभक्त शंकराच्या रूपदर्शनाने तृप्त होतात, तर विष्णुभक्त राम-कृष्ण-विठ्ठलाच्या रूपदर्शनाने

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

संतुष्ट होतात. याप्रमाणे अनेक हरि-हरभक्तशिरोमणि सगुण साक्षात्कार करून घेऊन धन्य झाले आहेत.

(४) शिवध्यानाविषयी आक्षेप व त्याचे उत्तर

विष्णुभक्ताचा आक्षेप– थांबा, थांबा! शिवभक्त शिवाचे व विष्णुभक्त विष्णूचे ध्यान करतात, एवढ्याचवरून शिव ध्यान आणि विष्णुध्यान समान आहेत असे कसे म्हणता येईल? सात्विक वेष, अलंकार व परिवारयुक्त विष्णूचे मनोहर रूप कुणीकडे आणि तामस वेष, अलंकार व परिवारामुळे असह्य असे शिवाचे रूप कुणीकडे? कानांत साप, गळ्यात साप, बाहूवर साप याप्रमाणे अंगभर साप घालणाऱ्या शिवाचे 'अहिभूषण' असे वर्णन शिवभक्त प्रेमभराने करीत असतात ते आश्चर्यच म्हणायचे? असो. चिताभस्म आणि रुंडमाला धारण करणाऱ्या शिवाच्या ध्यानाला, पीतांबर कौस्तुभ हार, शंख-चक्र-गदा-पद्म धारण करणाऱ्या विष्णूच्या ध्यानाची सर येणे त्रिकाली अशक्य! !

समाधान–ठीक आहे, या विषयाचा ही सूक्ष्म विचार करूया. विशिष्ट रूपाकृतीचा देव परमेश्वर अशी भावना भक्ताने एकदा ग्रहण केले की, जगत्कर्तृत्वादि महासामर्थ्य व भक्तवत्सलता करुणासागरादि गुणातिशय त्या देवाला आपोआप प्राप्त होतात. आणि त्याच्या रूपाचे गुणावगुण भक्ताच्या चित्तातून उडून जातात! प्राचीन युगधर्मामुळे, पुराणातील वर्णनामुळे किंवा कोणत्याही अन्य कारणामुळे विशिष्ट देवरूपाला परमेश्वर म्हणून मानले की, त्या देवाची मलिन–शुद्धता, -सुरूप–कुरूपता सारेच पूजनीयच वाटते. विष्णुभक्ताच्या दृष्टीने ती परमेश्वराची इच्छा किंवा लीला होते. विष्णुभक्तानो, तुम्हीं तुमच्या देवाच्या उदाहरणावरूनच हे समजून घ्या. शिव अनेक लहान मोठे साप अंगावर खेळवितो हे खरे; पण विष्णु

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ही एका फार मोठ्या सापावर झोपतो हेही खरे नां? 'तो महा शेषनाग विष्णूचा मंच (पलंग) आहे" असे तुम्हींही प्रेमानें वर्णन करता नां? तसेच विष्णूचे वाहन गरुड असल्यामुळे सर्पभक्षक गरुडाला इंद्रादि देवापेक्षाही श्रेष्ठ समजता नां? विष्णुचे अवतार म्हणून मासा, कासव, वराह, नरसिंह (अर्धा माणूस अर्धा सिंह), खुजा (वामन) इत्यादि सारी रूपे तुम्हाला सुंदर वाटतात नां? विष्णुवर्णनांतील वहुधा एकदशांश पदे दशावतार वर्णनपर आहेत. सारांश, बाह्य दृष्टचा अल्प गोष्टी विष्णूच्या परमेश्वर-त्वामुळे तुम्हाला सुंदर, प्रिय व स्तुत्य वाटतात, हे खरे नां? मग याच न्यायाने शिवाचे अहिभूषणत्व, चर्मांबर, रुंडमाला धारण वगैरे शिवभक्तांना प्रिय वाटले तर, त्यात अस्वाभाविक काहीच नाहीं. असो. सारांश असा कीं, परमेश्वररूपी उपास्य देवाचे रूप, वेष, अलंकार, आयुध, वाहन इत्यादि कसेही असले तरी उपासकाला तोटा नाहीं. 'अनंतात काहींही मिळविले तरी अनंतच आणि अनंतातून कांहीही उणे केले तरी अनंतच राहते.'* या बीजगणताच्या समीकरणाने ही गोष्ट सिद्ध होते–

$$\left.\begin{array}{l}\infty + \text{अ} = \infty \\ \infty - \text{आ} = \infty\end{array}\right\}$$ येथे अ, आ या अक्षरांना हवी ती किंमत देता येईल.

आणखीन एक समाधानाची गोष्ट अशी की, शिवाचे ध्यान करणाऱ्या भक्तानां, शिव चर्मांबर–कपाल–रुंडमालायुक्त रूपाने प्रत्यक्ष झाला तरी, त्याचे रूप तेजःपुंज व दृष्टि करुणार्द्र असते आणि तो भक्तांचा कल्पवृक्ष होऊन त्यांच्या सुखातिशयास

---

* पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥ –शांतिपाठ, ईशावास्योपनिषत्

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कारण होतो. हरभक्तांना सर्प–रुंडमालादिकांचा काहींच संसर्ग होत नाहीं. तसेच विष्णूचे ध्यान करणाऱ्या भक्ताना विष्णु वनमाला व कौस्तुभमणि यांनी सुशोभित शंख–चक्र–गदा-पद्म–धारी अशा रूपात प्रत्यक्ष झाला तरी, तो तेजःपुंज आणि प्रसन्न–वदन असतो, करुणाकटाक्षाने भक्ताकडे पाहतो आणि वरदानाने त्याला अतिशय सुखी करतो. विष्णुभक्ताला कौस्तुभादिकांचे प्रयोजनही नसते किंवा शेष–गरुडांचे भयही नसते. सारांश, ध्यानमूर्ति शिवाची असो किंवा विष्णुची असो. ते सगुण रूप अत्यंत प्रभावयुक्त, करुणापूर्ण आणि भक्तकामकल्पद्रुमच असते. त्या तेजोमूर्तीच्या दर्शनाने भक्त धन्य होतो.

आतापर्यंतच्या विवेचनाने आम्हीं शिवाची आणि विष्णूची नामस्मरण–भजन–ध्यान–सगुण साक्षात्कारादि भक्ती सारखीच फलप्रद आहे असे दाखवून दिले. "शिव परमेश्वर आहे" असे शिवभक्त म्हणतात आणि "विष्णु परमेश्वर आहे" असे विष्णु–भक्त म्हणतात; त्यांच्याशी आम्हीं सहमत आहोत. त्याचप्रमाणे, दोनही भक्तिमार्गांना पुराणांचा आधार, क्षेत्रांचे वैभव, गुरुपीठांची शक्ति, साधुसंतांचे बल, पदपद्य वाङ्मय इत्यादि सारखेच प्राप्त आहेत हेही आम्ही आनंदाने मान्य करतो. पण एका भक्ति मार्गाचे अनुयायीनी दुसऱ्या भक्तिमार्गीया विषयी सहानुभूति व विशाल दृष्टि ठेवावी, एवढीच आमची त्यांना विनंति आहे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रकरण : ३

हरिहरांच्या स्वरूपाचा निर्णय

पीठिका- ग्रंथाच्या उत्तरार्धाचे पहिल्या प्रकरणांत आम्ही शिव-भक्तीच्या आणि विष्णुभक्तीच्या शास्त्रोक्त आचरणाचे परीक्षण करून हरि-हरांच्या स्वरूपाचा शोध केला. त्यानंतर दुसऱ्या प्रकरणांत शिव-भक्तांच्या व विष्णूभक्तांच्या भक्तीचे भावदृष्टीने परीक्षण करून तोच शोध पुढे चालविला. ह्या दोनही संशोधनातून आपल्याला असे दिसून आले की, 'हरि' 'आणि' हर ही नांवे व त्यांची रूपे मात्र वेगळी; पण त्या देवतांच्या निज स्वरूपात आणि देवता भक्तीत संपूर्ण सारखेपणा आहे.

वरील फलितांशाच्या आधाराने व आणखी काहीं विशेष विचाराने आम्ही हरि-हरांच्या स्वरूपाचा निर्णय करणार आहोत. हरि आणि हर **एकच सर्वोत्तम परमेश्वर असून**, त्यांच्यातील भिन्नत्वाचा आभास केवळ **उपासनावैविध्य होय असे निःसंशय सिद्ध करणार आहोत**. तरी 'भक्तीच्या आचरणात आपल्या प्रमाणेच दुसऱ्यानांही, त्याना इष्ट असणाऱ्या नाम-रूपाची परमेश्वर भावनेने उपासना करण्याचे स्वातंत्र्य आहे.' ही समंजस दृष्टि स्वीकारून वाचकानीं विचार करावा, असे आम्हीं सुचवू इच्छितो.

(१) उपासनेसाठी परमेश्वराची रूपकल्पना

व्यासानीं सर्व पुराणांची रचना केली. त्यानीं काहीं पुराणांत "शिव परमेश्वर आहे. विष्णु-ब्रह्मादि सगळे देव शिव-भक्त असून, शिवापासून वर मिळवून ते ऐश्वर्य पावले, ते शिवापेक्षा निकृष्ट आहेत" असे वर्णन केले आहे. व्यासानीच दुसऱ्या काहीं पुराणांत 'विष्णु परमेश्वर आहे, शिव-ब्रह्मादि देव विष्णुभक्त असून, ते विष्णूची अनेक प्रकारांनी स्तुति करतात, सर्व देव विष्णूपेक्षा निकृष्ट आहेत" असेही वर्णन केले आहे. असे करण्यात व्यास महर्षींचा उद्देश काय असेल बरे?

शिवभक्तांच्या मनांत शिवाबद्दल पूर्ण भक्ति जडावी

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

म्हणून विष्णु आदि अन्य देवता शिवापेक्षा कनिष्ठ आहेत असे व्यासानीं सांगितले आहे. तसेच विष्णुभक्तांच्या मनात विष्णू-बद्दल पूर्ण भक्ति उपजावी म्हणून शिवादि अन्य देवता विष्णूपेक्षा कनिष्ठ आहेत असे सांगितले आहे. सारांश एवढाच की, **विष्णु-निकृष्टत्वाने शिवाची परमेश्वरता शिवभक्तांच्या मनावर बिंब-विणे हाच व्यासांचा उद्देश असून, विष्णूची निंदा करणे हा काहीं त्यांचा उद्देश नव्हे. त्याचप्रमाणे शिवाचे निकृष्टत्व दाखवून विष्णूचे परमेश्वरत्व विष्णुभक्तांच्या मनांत दृढ करणे हाच व्यासांचा उद्देश असून, शिवाची निंदा करणे हा काहीं त्यांचा उद्देश नाही.***

वर सांगितल्याप्रमाणे शिव – विष्णू विषयीच्या श्रेष्ठ कनिष्ठता वर्णनाचा अभियतार्थ ध्यानांत न घेता, केवळ नांवा-वरून भांडणाऱ्या लोकांना **श्याल–सारमेय न्याय** लागू होतो. श्याल–सारमेयाची कथा प्रथम सांगून, त्यानंतर त्या न्यायाचा अन्वय करू.

महाराष्ट्रांतील एका खेड्यांत एक शिपी रहात असें. त्याच्या घरी नाम्या नांवाचा कुत्रा होता. त्याच्या शेजाऱ्याच्या कुत्र्याचे नांव दाम्या होते. ते कुत्रे एकमेकाशी फारच भांडत असत. तेंव्हा तो शिपी नाम्याला वाहवा करीत असे आणि दाम्याला शिव्या देत असे. "नाम्या संभावित असून दाम्याच फार दुष्ट आहे" वगैरे आपल्या मुला बरोबर बोलत असे.

---

* कारनरूप उपास्य पिछानहु । ताके नाम अनंतहि जानहु ॥
कारनरूप तुच्छ लखि तजिये । यह सिद्धांत वेदको भजियें ॥
रचे व्यास इतिहास पुराना । तिनमें यह मत कहि नहि नाना ॥

–विचारसागर, सप्तम तरंग : ६७-६८

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

त्या शिष्याच्या घरीं नुकतीच नवी सून आली होती, गमतीची गोष्ट अशी की, त्या सुनेच्या भावाचे नांव दामूअण्णा असून, दामूअण्णाच्या शेजारी नामदेव नांवाचा गृहस्थ रहात असे. स्वैपाक घरात काम करीत असलेल्या सुनेला कुत्र्याबद्दल काहींच माहिती नसल्यामुळे, आपला सासरा व नवरा 'आपल्या भावाला शिव्या देतात व भावाचा शेजारी नामदेवाचे वर्णन करतात' असें समजून ती फार दुःखी होत असे! आपल्या नवऱ्याला व सासऱ्याला मनांत दूषण देत असे आणि त्यांचा द्वेष करीत असे! !

वरील श्याल-सारमेय न्याय आपल्याला लागू होऊ नये, अशी इच्छा असेल तर, शिवभक्त व विष्णूभक्त दोघांनीही केवळ नांवावर न जाता, खरा अर्थ समजून घेतला पाहिजे. शिवभक्त विष्णूला कमी लेखत असले तर तो, आपण उपासना करीत असलेला सर्वज्ञ, पमेश्वररूपी विष्णु नव्हे, तर एक विशिष्ट शक्तिरूपी विष्णु होय, हे वैष्णवानीं जाणावे. तसेच विष्णुभक्त शिवाला कमी लेखत असले तर तो, आपण उपासना करीत असलेला सर्वज्ञ, परमेश्वरूपी शिव नव्हे, तर एक विशिष्ट शक्तिरूपी शिव होय, हे शैवानीं जाणावे. याप्रमाणे खरा अर्थ जाणणारे सद्भक्त दुसऱ्यांच्या भक्तीमध्ये वर्णिलेले आपल्या देवाचे निकृष्टत्व आणि आपल्या भक्तीमध्ये वर्णिलेले दुसऱ्यांच्या देवाचे निकृष्टत्व यांना महत्व न देता, एक परमेश्वराच्या भक्तीतच मन स्थिर करतात. त्यांना आपल्या व दुसऱ्यांच्या उपास्य देवतेचे एकत्व कळलेले असते.

"उपासनार्थं ब्रह्मणो रूपकल्पना" या उक्तीप्रमाणे सर्वव्यापक, सर्वात्मक परमेश्वराची शिव, विष्णु वगैरे देवतेच्या रूपांत आम्हीं भावना केली आहे. चतुर्भुज, त्रिनेत्र इत्यादि मूर्ती परमेश्वराचे

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

स्वरूपलक्षण नसून, त्यांचे उपलक्षण होय. उदाहरणार्थ, "ते पहा, कबूतर बसले आहे तेच मित्राचे घर" असे हाताने दाखवतो. घरावर कबूतर बसणे हे काहीं घराचे स्वत:सिद्ध स्वरूप लक्षण नव्हे. तरीही कबूतरामुळे आपल्याला घर ओळखता येते म्हणून त्याला उपलक्षण म्हणतात. या दृष्टांताप्रमाणे चतुर्भुज, त्रिनेत्र इत्यादि साकार देवतेमुळे सर्वज्ञ, सर्वशक्तिमान् परमेश्वराला ओळखायचे आहे. पण सर्वज्ञता, सर्वव्यापकता इत्यादि परमेश्वराच्या स्वरूप लक्षणात चतुर्भुजत्वही नाहीं किंवा त्रिनेत्रत्वही नाहीं. प्राचिन काळातील त्रिशूल, धनुष्य, बाण, गदा इत्यादि आयुधे किंवा मध्ययुगीन डमरु, शंख इत्यादि वाद्ये जगदादि परमेश्वराच्या स्वरूपलक्षणात असणे असंभवनीय होय. परंतु ही नामरूपे परमेश्वराचे उपलक्षण होऊ शकतात.

(२) शिव–विष्णु देवतांचे स्वरूपलक्षण

आता आपण शिव–विष्णूंचे निश्चित स्वरूपनिर्णय करणाऱ्या महत्वाच्या विषयाप्रत येऊन ठेपला आहोत. सगळचा पुराणांत प्रामुख्याने वर्णिलेल्या देवतांच्या स्तोत्रांवरून हा निर्णय घेण्यास वरीच मदत होईल. तरी आपण सर्वपरिचित भागवत महापुराणांतील तसल्या कांहीं स्तोत्रांचे या दृष्टीने परीक्षण करूया–

(१) समुद्रमंथनाच्या प्रसंगी सर्वात प्रथम हालाहल विष निघाले. त्यांचा दाह साऱ्या जगाला पीडा करू लागला, तेंव्हा सारे देव कैलासांत शंकराला शरण गेले. त्यानीं अशी स्तुति केली– "देवतांचे आराध्य दैवत महादेवा, तूं साऱ्या प्राण्यांचा आत्मा, तू **अनंत आणि एकरस असूनही जगाचे उत्पत्ति, स्थिति, लय करण्यासाठी ब्रह्मा, विष्णु, शिव अशी नांवे धारण करतोस.** तू स्वयंप्रकाश

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ब्रह्मतत्त्व आहेस. सर्व देवतांना, माणसांना, पशुपक्ष्यादि प्राण्यानां जीवन देणारा तूच आहेस. तूच सर्वसमर्थ ईश्वर आहेस... ..... परमेश्वरा, तुझ्या अनंत स्वरूपाचे ज्ञान करून घेणे ब्रह्मादि देवांनांही साध्य नाहीं!"*

–भागवत, स्कंद–८ अध्याय–७

(२) विष्णूने मोहिनीचे रूप घेतले, असा वृत्तांत ऐकून भगवान शंकर पार्वतीसह नंदीवर बसून वैकुंठास आले. तेव्हां विष्णूने गौरी–शंकरांचे स्वागत आणि सत्कार केला. त्यावेळेस महादेवाने विष्णूची अशी स्तुति केली–"सर्व देवतांच्या आराध्य देवा, तू विश्वव्यापी जगदीश्वर आहेस. चराचर वस्तूमध्ये व्यापक आणि सर्वांचा आत्मा तू आहेस. तुझ्यामुळेच जगाची उत्पति, स्थिति आणि लय होत असली तरी तुला मात्र आदि–मध्य–अंत नाहीं. खरोखर तू चिन्मय ब्रह्म आहेस. ज्याप्रमाणे अलंकार व सोने यामध्ये अंतर असत नाहीं, त्याप्रमाणे कार्य आणि कारण, द्वैत आणि अद्वैत इत्यादि सर्व एकमात्र तूच आहेस......... लोकांना तुझे खरे स्वरूप कळत नाहीं म्हणून ते तुझ्याबद्दल अनेक भेदभावांचीं कल्पना करतात......"प्रभो! काहींजण तुला ब्रह्म म्हणतात, कोणी धर्म म्हणतात, प्रकृति–पुरुषांच्या पलीकडे असलेला परमेश्वर असे काहीं जण म्हणतात आणि क्लेशकर्मा–दिरहित पुरुषविशेष असे दुसरें कोणी वर्णन करतात."

–भागवत, स्कंद–८, अध्याय १२

(३) विष्णुने शंकराची स्तुति केली की "सर्वगुणपरिपूर्ण, अनंत आणि अव्यक्त अशा भगवान् शिवाला मी नमस्कार

---

* विष्णुपुराण भागवतांत शिवाचे परमेश्वररूपाने वर्णन करणारे हे स्तोत्र लक्षात ठेवण्यासारखे आहे. तसेच स्कंदपुराण इत्यादि शिवपुराणांत विष्णूचे परमेश्वररूपाने वर्णन करणारी स्मरणीय स्तोत्रे आहेत.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

करतो. सर्व ऐश्वर्याचे आश्रयस्थान आणि भवनाशक ईश्वरास मी भजतो. **ब्रह्मदेव आणि मी कळसूत्री बाहुल्याप्रमाणे ज्याच्या आधीन आहोत व ज्याच्या अनुग्रहामुळे सृष्टयादि कार्ये करतो असा तुला नमस्कार असो"** **–बृ. स्तो.**

(४) शंकराने श्रीकृष्णाची अशी स्तुति केली आहे "प्रभो, तू परमज्योतिस्वरूप परब्रह्म आहेस. परिशुद्ध हृदयाच्या भक्तांना तुझ्या सर्वव्यापक व निर्विकार स्वरूपाचा साक्षात्कार होतो. आकाश तुझी नाभि, दिशा तुझे कान, पृथ्वी तुझे पाय, चंद्र तुझे मन, सूर्य तुझे नेत्र आणि मी (शिव) तुझा अहंकार आहे. तु सजातीय–विजातीय–स्वगत भेदरहित व एकमेवा–द्वतीय आहेस. मायाकृत तीन अवस्थारहित तुरीय तू आहेस **प्रभो! मी, ब्रह्मदेव आणि सर्व देवता तुला शरण आलो आहो; कारण, तूच आम्हां सर्वांचा आत्मा. प्रियतम आणि ईश्वर आहेस.** **–भागवत**

यानंतर उपास्य देव भक्तांना प्रत्यक्ष होऊन, आशिर्वाद–रूपाने बोललेली अनुग्रहवाक्ये सुद्धा, त्या देवाच्या स्वरूपनिर्णयास प्रमाणभूत ठरतात. आम्हीं विस्तारभयास्तव तसल्या एकाच अनु–ग्रहवांणीचे उदाहरण येथे देत आहो–दक्षयज्ञाचा ध्वंस झाल्यावर शंकराने यज्ञ पूर्ण करण्यास दयेने संमति दिली. तेव्हां भगवान् विष्णु तिथे प्रकट झाले. व त्यावेळेस ब्रह्मदेव, शंकर, दक्ष, ऋषि, मुनि या सर्वांनी त्याची स्तुति केली. तेंव्हा श्रीविष्णु अनुग्रहरूपाने असे बोलले कीं–"जगाचे परम कारण असा मीच ब्रह्मदेव आणि महादेव आहे. मी सर्वांचा आत्मा साक्षी, स्वयंप्रकाश व उपाधिशून्य आहे. **त्रिगुणात्मक मायेचा स्वीकार करून मीच जगाची उत्पत्ति, परिपालन आणि संहार करतो व या कार्यामुळे**

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मीच ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर अशी नांवे धारण करतो. आम्हीं स्वरूप: एकच आहोत म्हणून जो आमच्यांत थोडाही भेद पहात नाहीं, त्याला शांति प्राप्त होते," –भागवत, स्कंद–४, अध्याय–७

वरील पुरेशा अवतरणांवरून, उपास्य विष्णु व उपास्य शिव हे स्थिति–लय करणारे विष्णु–शिव नसून, 'त्यांना पालन व संहारशक्ति देणारा, अथवा स्वत:च विष्णु–शिवांचे रूप धारण करणारा परात्पर परमेश्वरच' ते आहेत, हे तळहातावरील आवळ्याप्रमाणे स्पष्ट झाले आहे. कांहीं ठिकाणीं विष्णु शंकराची "परमेश्वर" म्हणून स्तुति करतो, तर अन्य काहीं ठिकाणी शंकर विष्णूची "परमेश्वर" म्हणून स्तवन करतो. यावरून गुणात्मक विष्णु–गुणात्मक शिवापेक्षा निराळे असणारे उपास्य विष्णु किंवा उपास्य शिव कोणीही सर्वव्यापक, सर्वात्मक परमेश्वर होत, असे नि:संशय सिद्ध होते.

(३) ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर हे तिघेही परमेश्वर असल्याचे सांगणारा एक पौराणिक प्रसंग

"चराचर जगाचा जो स्वामी आहे, त्यास मी शरण आलो आहे" असे म्हणून अत्रिऋषीने तप आचरण्यास प्रारंभ केला. त्याप्रमाणे काहीं काळ तप केले असता ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर या तीनही देवानीं प्रकट होऊन त्याला दर्शन दिले. तेव्हां अत्रीने त्यांना प्रश्न केला कीं "देवतांनो, मी एकाच परमेश्वराचे ध्यान केले असता तुम्हीं तिघे जण आला आहात. तर तुम्हां–मध्ये परमेश्वर कोण ते मला सांगा" तेंव्हा ब्रह्मा, विष्णु, महे–श्वर त्याला म्हणाले, 'तू परमेश्वराच्या साक्षात्काराची इच्छा केलीस ना? तर मग परमेश्वर नसलेल्याने येथे येण्याचे कारण

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

नाहीं! अर्थात् **आम्हीं तिघेही परमेश्वर आहो.**" असे सांगून, अत्रीला वर देऊन तें अंतर्धान पावले. **-भागवत, स्कंद४-अध्याय-१**

(४) पुराणांतर्गत हरि-हरांचा अभेद व हरि-हर निंदेचा कटु निषेध

हर अथवा हरीस एकदा परमेश्वरत्व दिल्यावर, त्या परमेश्वराचा एक अंशरूप पालनकर्ता हरि अथवा संहारकर्ता हर त्याच्या आधीन असतो, असे वर्णन करणारी पुराणेच हरि, हर हे सारखेच उपास्य असल्याचे भक्तांच्या निदर्शनास आणून देण्यास विसरली नाहीत, हे आपण वर पाहिले. आता, हरि-हरांच्या एकत्वाचा उपदेश करणारे आणि-हर निंदेचा कटु निषेध करणारे काहीं पौराणिक श्लोक खाली देत आहो-

(१) स्कंद पुराणांतील यमधर्मराज विरचित हरिहर स्तोत्र--

गोविंद माधव मुकुंद हरे मुरारे
शंभो शिवेश शशिशेखर शूलपाणे ।
दामोदराच्युत जनार्दन वासुदेव
त्याज्या भटा य इति संततमामनंति ।।
गंगाधरांधकरिपो हर नीलकंठ
वैकुंठ कैटभरिपो कमठाब्जपाणे ।
भूतेश खंडपरशो मृड चंडिकेश
त्याज्या भटा य इति संततमामनंति ।।

-स्कंद पुराण, का. पू. ८, ९९-१००

भावार्थ-"यमधर्म आपल्या दूतांना अशी आज्ञा करतो की "दूतानो जे भक्त नेहमी गोविंदा, माधवा, मुकुंदा, हरे, मुरारे; शंभो, शिवा, ईश्वरा, शशिशेखरा, शूलपाणे; दामोदरा, अच्युता,

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

जनार्दना, वासुदेवा याप्रमाणे सतत स्मरण करीत असतात, त्यांच्या वाटेला तुम्हीं जाऊ नका.

दूतानो, जे भक्त नेहमी "गंगाधरा, अंधकशत्रो, हरा, नीलकंठा; वैकुंठाधिपते, कैटभशत्रो, मुरलीधरा; भूतनाथा, खंडपरशो, शंकरा, चंडिकेश्वरा याप्रमाणे सतत स्मरण करीत असतात त्यांच्या वाटेला तुम्हीं जाऊ नका."

याप्रमाणे हरि–हरांची १०८ नामें सांगून, शेवटी "कौस्तुभ-धारी विष्णूचे आणि चंद्रशेखर शिवाचे हे स्तोत्र पठण केल्याने सर्व पापांचा नाश होतो व पुनर्जन्म टळतो" असा या स्तोत्राचा महिमा सांगितला आहे.

(२) **अनादिनिधने देवे हरि–शंकरसंज्ञिते ।**
संसारसागरे मग्ना भेदं कुर्वंति पापिनः ।। –बृहन्नारदीय

भावार्थ– विष्णु आणि शिव या नावांचे अनाद्यनंत परमेश्वरांत, संसारसागरी पडलेले पापी लोकच भेद करतात.

(३) **शिवस्य हृदयं विष्णुः विष्णोश्च हृदयं शिवः ।**
ईषदप्यंतरं कृत्वा रौरवं नरकं व्रजेत् ।। –नारद पुराण

भावार्थ– शिवाचे हृदय विष्णु आणि विष्णूचे हृदय शिव होय. त्यांच्यात थोडासाही भेद करणारे रौरव नरकास जातात.

(४). **श्रीरामः–ममासि हृदये शर्व भवतो हृदये त्वहम् ।**
आवयोरंतरं नास्ति मूढाः पश्यंति दुर्धियः ।।
ये भेदं विदधात्यद्धा आवयोरैक्यरूपयोः ।
कुंभपाकेषु पच्यंते नराः कल्पसहस्रकम् ।।

पद्मपुराण, पातालखंड : ४६।२०–२१

भावार्थ–श्रीराम म्हणतो "शंकरा, तू माझ्या हृदयात आहेस आणि मी तुझ्या हृदयात आहे. तुझ्यामाझ्यात भेद नाहीं

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तरीसुद्धा दुर्बुद्धीचे मूर्ख लोक आमच्यात भेद पाहतात! एकरूप असलेल्या आम्हांमध्ये भेद करणारे लोक सहस्र कल्पापर्यंत कुंभीपाक नरकात खितपत पडतात!!

(५) हरि–हरामध्ये भेद करणे महापातक

हरि–हरामध्ये भेद करणे घोर पातक असल्याचे, पौराणिक आधाराने दाखवून देणाऱ्या एका पदाचा भावार्थ खाली देत आहो–

हरि–हर एकरूप असूनही, त्यांच्याता भेद मानणाऱ्या संकु–चित लोकांना कोणती गति मिळते ते ऐका– ।।ध्रु।।

सौर पुराणांत सांगितले आहे की, "शंकराची निंदा कर–णाऱ्या विष्णुभक्ताला विष्णूमध्ये आश्रय मिळत नाही." ।।१।।

नारद पुराणांत सांगितले आहे की, "शंकर हरि स्वरूप आहे आणि विष्णु हरस्वरूप आहे. त्यांच्यात भेद करणारा नरकास जातो." ।।२।।

स्कंद पुराणांत सांगितले आहे की, "शिवद्रोही वैष्णव आणि विष्णुद्रोही शैव या दोघानाही रौरव नरक प्राप्त होतो." ।।३।।

भविष्य पुराणांत असे सांगितले आहे की, "हरि–हरामध्ये भेद करणाऱ्याना भ्रूणहत्येचे पाप लागते."

वायुपुराणांत सांगितले आहे की, "हरि-हरामध्ये एक श्रेष्ठ व एक कनिष्ठ असे समजणारे पिशाच किंवा राक्षस होतात" ।।५।।

पुराणांत सांगितल्याप्रमाणेच सर्व साधु–संतांनीही "हरि–हर एकरूप आहेत" असा उपदेश केला आहे. "हा सत्य सिद्धांत जाणून पावन हो" असे **हणमंतरावजी*** विनंति करतात. ।।६।।

---

* हणमंतराव को[illegible] महाराज, सांगली.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

 CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

(६) परमेश्वर एकच आहे.

"परमेश्वर एकच आहे; तोच हरि आणि तोच हर" याविषयीचे काहीं कन्नड कवीचे उद्‌गार पुढीलप्रमाणे आहेत-

१) **सर्वज्ञ कवि** म्हणतात- "जगाला देव एकच असू शकतो; कधीतरी दोघे असतील काय? जगत्कर्ता सर्वज्ञ देव एकच हे निश्चित."

२) **हरिहरदेव** विरूपाक्षशतकात म्हणतात- "मी शिवाला विष्णु म्हणूनच स्मरण करतो, व विष्णूला शिव म्हणूनच स्मरण करतो. ते दोघेही एकमेव परमेश्वराहून वेगळे नाहींत."

३) **मुप्पिन षडक्षरी** म्हणतात-"सगळ्या लोकांचा तूच निष्कलंक आदि गुरु आहेस, हे सर्व शास्त्रांच्या सांगण्यावरून मी जाणले. त्या त्या मतांच्या भक्तांना दर्शन देण्यासाठी, त्यांच्या त्यांच्या वेषांत येणारा त्यांचा त्यांचा देव तूच आहेस. त्यांच्या त्यांच्या भावनेप्रमाणे त्यांच्या त्यांच्या पूजेसाठी अनुरूप वेष घेणारा त्या सर्वांचा देव तूच एक आहेस.

देवा, भांडण लावण्यासाठी तू निरनिराळा झालास की काय नकळे! येऱ्हवी भिन्नपणा जगात आहेच कोठे? शंकरा, तू कोणत्या कारणाने वेगवेगळा झालास हे कुणाला बरे माहीत आहे?

४) सर्व मतांच्या भक्ताना आपापल्या उपास्यदेवतेचीच भक्ती करण्यास सांगणाऱ्या सद्‌गुरूविषयी-

सद्‌गुरु किती मोठा जादूगार आहे बरे! (तो) 'लिंगायतांना संगमेश्वराचे नामस्मरण सांगून त्यांच्यासाठी जंगम बनलेला असतो! वैष्णवांना मुकुंद, मुरारी, प्राणेश या नांवाचे नामस्मरण सांगतो.' याप्रमाणे जैप्रभु सद्‌गुरु हिमतीने, सगळ्या मतांच्या लोकांना परमात्म्याचे नामस्मरण करवितात!

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

(७) "आमच्या धर्मा-देवामुळेच स्वर्ग, दुसऱ्यांच्या धर्मा देवामुळे नरक" असल्या दुरभिमानाचे खंडन

येथे एक धार्मिक ख्रिश्चन आहे. तो आपल्या धर्माचे नियम अत्यंत श्रद्धेने पाळतो. दररोज सायंकाळी प्रार्थना करतो. प्रत्येक रविवारी चर्चला जातो. मरणानंतर स्वर्गात देवदूत (*Angels*) आपले स्वागत करतील असा विश्वास तो जन्मभर बाळगतो. वेदांत त्याला असे सांगतो– 'मेल्यावर स्वर्गात येशू ख्रिस्ताच्या उजवीकडील आसनावर बसलो आहो असे त्याला दिसते. त्याच्या धर्मग्रंथाने दिलेला भरवसा पुरविला जातो" ·

वर वर्णन केलेल्या धार्मिक ख्रिश्चनाप्रमाणेच एका धार्मिक मुसलमानाचे उदाहरण घेऊ. तो दररोज पाच वेळा नमाज करतो. इस्लामासाठी आपला जीव बलिदान करण्यासही तो तयार असतो. अप्सरांचे गायन–वादनादि सुखांनी भरलेला स्वर्ग मरणोत्तर आपल्याला मिळेल, असा विश्वास तो जन्मभर बाळगतो. वेदांत सांगतो की, "असला निष्ठावंत मुसलमान मेल्यावर त्याच्या धर्मग्रंथात सांगितल्याप्रमाणे स्वर्गसुख अनुभवितो.

परंतु येथे आश्चर्याची गोष्ट ही की, धार्मिकते बरोबरच दुरभिमानाने पछाडलेल्या ख्रिश्चनांना व मुसलमानांना केवळ आपापल्या स्वर्गामुळे तृप्ति नाहीं! ख्रिश्चनेतर सर्व धर्मीयांना नरकात पाठविण्यास धर्मवेडा ख्रिश्चन आतुर असतो! कट्टर मुसलमानही ख्रिश्चनांना, हिंदूना आणि अन्य धर्मीयांना नरकात पाठविण्यास उतावीळ असतो! ख्रिश्चन अशी जाहीर घोषणा करतो की, "येशू हाच उद्धार कर्ता आहे, असा विश्वास धरा तोच देवाचा पुत्र आणि प्रेषित आहे. तुम्हीं त्याचा अंगीकार न केल्यास तुमच्यासाठी नरक राखून ठेवला आहे! !" मुसलमान

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

 CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

सुद्धा मोठ्याने ओरडून सांगतो की "महंमदावर विश्वास ठेवा तरच तुम्हाला स्वर्गप्राप्ति! नाहीतर अधःपतन ठरलेले!!"

वरील सारख्या धर्मांधतेच्याप्रसंगी वेदांत ख्रिश्चनाला सांगतो की–"अहो, ख्रिश्चन महाशय **जगातील सर्व देशांच्या व सर्व धर्मांच्या लोकांनीं येशूच्याच अंकित कां बरे असावे?** अरबस्तान, इजिप्त, हिंदुस्थान इत्यादि देशांत मरण पावणाऱ्या सर्वांची विचारणा येशूच्या नियमाप्रमाणेच कां व्हावी? ख्रिश्चन धर्मीयाप्रमाणेच अन्य धर्मीयांनाही. त्यांचे प्रेषित, त्यांचे देव, त्यांचे स्वर्ग इत्यादि सर्व असतांना, त्या **सर्वांवर अधिकार चाल-विण्यास तुम्हीच (ख्रिश्चनांनीच) सनद कोठून मिळविली?"**

मुसलमानालाही वेदांत असा विवेक सांगतो– "अहो, महंमदीय महाशय! विश्वांतील सर्व लोकांना तुमचा प्रवादी महंमद पैगंबराच्या करुणेस व परीक्षेस पात्र करण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे? "**महंमदावर विश्वास ठेवल्यास ठीक; नाहींतर तुम्हीं नष्ट व्हाल, घोर नरकांत पडाल!" अशी क्रूर शिक्षा देण्याचा अधिकार तुम्हाला कोठून मिळाला?** अमेरिका, जपान, हिंदुस्थान अथवा अन्य देशात कोणीही भिन्न धर्मीय मरण पावल्यास, त्यानीं तुमच्या महंमदाच्या दयेस पात्र व्हावे हा कोठला न्याय?

–स्वामी रामतीर्थ

वरील अवतरणांत दोन धर्मानुयायींच्या दुराग्रहाची रीत दाखवून समंजस उत्तरही सांगितले आहे. हाच न्याय शैव, वैष्णव किंवा अन्य मतानुयायींच्या हटवादाला तंतोतंत लागू होतो. इतकेच का, ख्रिश्चन, मुसलमान या दोन शब्दांच्या जागी शैव वैष्णव हे शब्द किंवा कोणताही मतदर्शक शब्द वापरण्यास कोणतीच हरकत नाही.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

(८) उपास्य देव 'परमेश्वराच्या' आणि 'अन्य देवतांच्या' भक्तीचे रहस्य

सगळ्या सर्वेश्वर देवतामतांत 'अन्य देवताभक्ती'चा विषय येतो. त्यांत **प्रत्येक उपास्य देवाने "मी परमेश्वर असून बाकीचे देव माझे एकेक शक्तिविशिष्ट अंश आहेत" असे सांगितल्याचे आढळते.** हरि, हर, देवी, गणेश इत्यादि "प्रत्येक सर्वेश्वर देवतेनें माझी (परमेश्वराची) भक्ति व विशिष्ट फल देणारी अन्य-देवताभक्ति" असे भगवद्गीता, शिवगीता, गणेशगीत इत्यादि ग्रंथात विवरण केले आहे. कृष्णाने भगवद्गीतेत "सर्वेश्वर असलेल्या माझी भक्ति करण्याचे सोडून, लोक अल्प फलांच्या आशेने अन्य देवतास भजतात" असे म्हटले असून, शिवाने शिव-गीतेत, गणेशने गणेशगीतेत वगैरे शब्दशः तसेंच निक्षून म्हंटले.

प्रत्येक भक्त आपल्या देवाने सांगितलेल्या अन्यदेवताभक्तीचे निकृष्टतेच्या आधारावर त्याचे (आपल्या देवाचे) सर्वश्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. परंतु सर्वेश्वरत्व तर एकच असून अनेक देवता त्या पदावर आरूढ होणे शक्यच. नाही असे असता, अन्यदेवताभक्तीचे रहस्य न समजल्यामुळे, आम्हीं या ग्रंथाच्या पूर्वार्धात दर्शविल्याप्रमाणे, विविध भक्त हरि, हर, देवी, गणेश इत्यादि देवतांपैकीं एकाला सर्वोत्तमत्वांच्या पीठावर वसवून बाकीच्याना खाली ढकलण्याचा प्रयत्न करतात व त्यामुळे भांडण करीत समाजाचे तुकडे पाडतात!

प्रश्न– वर वर्णन केलेली परिस्थिति येऊ देणे हे नक्की अनिष्ट होय. पण त्यापक्षी, मुख्य देवाच्या व अन्य देवतांच्या भक्तीचे रहस्य काय?

उत्तर– **"जगाची उत्पत्ति–स्थिति-लयकर्ता, सर्वांतर्यामी**

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आणि सर्वज्ञ मी" असे सर्व मतांतील अधिदेव सांगतो, **ते मुख्य (उपास्य) देवाचे स्वरूप** आणि **एकेक शक्तिविशिष्ट देवता हे अन्य देवतांचे स्वरूप होय.** हरिभक्त आपल्या डोळ्यापुढे देवाचे चतुर्भुज रूप पाहत असला तरी, त्याने हरि हा सर्वव्यापक, सर्व-प्रेरक परात्पर परमेश्वर आहे अशीच भावना करावी; शिवभक्त आपल्यापुढे नीलकंठ शिवाचे रूप पहात असला तरी त्याने शिव हा सर्वशक्त, सर्वात्मा परमेश्वर आहे अशीच भावना करावी; तसेच सर्व देवताभक्तानीं **आपल्या उपास्य देवतारूपांत परमेश्वराची भावना धरावी हेच शास्त्रसार आहे.** असे असल्यामुळे आम्हीं परमेश्वरप्रतीकाच्या स्थानी हरि, हर, देवी, गणेश इत्यादि कोणाही एका देवतेची स्थापना करु शकतो. आणि तसे करताच बाकीचे सर्व देव अन्य देवता ठरतात. सारांश, "**कोणत्याही एक देवरूपानें सर्वांतर्यामी, सर्वात्मा परमेश्वराचीच उपासना करावी, कामनेने निरनिराळ्या देवांची भक्ति करणे निकृष्ट आहे**" हे मनावर बिंबविण्याचा उद्देश, अन्यदेवता भक्तिप्रतिपादनांत असतो. शिवाय, "मी उपासना करतो तो नामरूपविशिष्ट देवच सर्वेश्वर दुसरे परमेश्वरभावनेने उपासना करीत असलेले नामरूपविशिष्ट देव म्हणजे निकृष्ट अन्यदेवता" याप्रमाणे उपास्य देवांचीं श्रेष्ठ-कनिष्ठता ठरविणे हा काहीं पुराणांचा उद्देश नव्हे. तसा उद्देश आपण गृहीत धरला तर, पुराणें काहीं जणांना विष्णु सर्वश्रेष्ठ, कांहीं जणांना शिव सर्वश्रेष्ठ, अन्य काहीं लोकांना गणेश सर्व-श्रेष्ठ असे भाविक लोकांना वेगवेगळे सांगून फसवतात व शाश्वत कदर निर्माण करणारे ते हितशत्रू आहेत असे म्हणावे लागेल! !

प्रश्न–आमच्या उपास्य देवाची सर्वश्रेष्ठता आणि सर्वेश्वरता उपासनेसाठी आवश्यक नाही काय? अनेक देवता आमच्या

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

देवाबरोबरीच्या आहेत असे मानले तर सर्वोच्च परमेश्वर भावनेनें उपासना घडणार नाहीं.

उत्तर– होय जगत्कर्ता, जगत्पालक, जगद्व्यापक, सर्वांतर्यामी परमेश्वराची, तुमच्या देवतेच्या रूपात तुम्हीं उपासना करावी हे योग्यच आहे. परंतु त्यासाठी तुमच्याप्रमाणेच सर्व तऱ्हेने उपासना करणाऱ्या भक्तांच्या उपास्य देवतेची निंदा करणे काहीं आवश्यक नाहीं. याविषयी 'भागवत सांप्रदायांतील ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादि विठ्ठल भक्तानीं चुकूनही शिवनिंदा केली नाहीं, इतकेच नव्हे तर त्यांच्या मनात 'शंकराबद्दल भक्तिभाव होता' हे उदाहरण म्हणून देता येईल. या संतशिरोमणीनी आपल्या ग्रंथांत व अभंगात 'शंकर विष्णूचा परम मित्र", "विष्णु आणि शिव एकमेकांना पूज्य मानणारे समान देव" अशीच भावना प्रकट केली आहे. काहीं ठिकाणी "शंकर विष्णूचा जीवप्राण असलेला परमभक्त" असे वर्णन असले तरी, त्यांत शिवनिंदेचा उद्देश नाहीं.

परम रामभक्त तुलसीदासांच्यां मनात शंकराबद्दल अत्युदात्त भावना होती. त्यांच्या 'रामचरित मानस' (तुलसीरामायण) या सुप्रसिद्ध हिंदी ग्रंथात पुष्कळ ठिकाणी शिवाबद्दलचा पूज्यभाव प्रकट झाला आहे. उदाहरणार्थः-

(१) **श्रीरामः– संकरप्रिय मम द्रोही शिवद्रोही मम दास ।**
ते नर करहि कलपभरि घोर नरकमहु बास ॥

–रामचरितमानस : ६–२

भावार्थ–श्रीराम सांगतातः– शिवभक्ताने माझा द्रोह केला किंवा माझ्या भक्ताने शिवद्रोह केला तर ते दोघेंही कल्पांतापर्यंत नरकात पडतात!

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

(२) श्रीराम:– औरउ एक गुपुत सबहि कहउ कर जोरि ।
संकरभजनबिना नर भगति न पावइ मोरि ॥
–रामचरितमानस : ७–४५

भावार्थ– श्रीराम म्हणतात:–हात जोडून सर्वांना आणखीन एक रहस्य सांगतो ते ऐका. शंकराचे भजन केल्याशिवाय मनुष्य माझी भक्त पावत नाहीं.

(९) हरिहरांच्या एकत्वासाठी झालेले प्रयत्न

सूक्त विचाराच्या नैज भक्तांना हरि–हरामध्ये भेद दिसत नसला तरी, शिवोपासना व विष्णूपासना यांच्यातील वरदिखाऊ भेदामुळे, त्या त्या जनसामान्य उपासकांमध्ये विरोध उत्पन्न झाला आणि कालक्रमाने तो विकोपास गेला. परंतु हरि–हरांची एकता जाणणाऱ्या ज्ञानी भक्तांना परस्परातील हे भांडण हेय वाटून, त्यानीं हरि आणि हर एकरूप आहेत हा सिद्धांत प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. सामान्य जनतेत अल्पबुद्धीमुळे दृढमूल झालेला हरि–हरभेद नाहीसा करण्यासाठी वेळोवेळी असे अनेक प्रयत्न झाले आहेत, त्यांचा येथे संक्षेपाने निर्देश करीत आहो–

१) लोक पुराणकाळांत शिव, विष्णु, देवी, गणेश व सूर्य या पांच देवतांची प्रामुख्याने उपासना करीत होते, या पाच देवतांचे उपासक आपलीच देवता श्रेष्ठ व अन्य देवता कनिष्ठ लेखून भांडण करीत असत. ही परिस्थिति सहन न होऊन, ज्ञानीउपासकांनीं त्यांतून एक मार्ग काढला, तो असा– शिव, विष्णु, देवी गणेश व सूर्य या पाच देवतांपैकी कोणत्याही एक देवतेला परमेश्वररूपी उपास्य देवता मानून मध्यस्थानी स्थापना करावी आणि अन्य चार देवतांना भक्तदेवता मानून तिच्या चाऱ्ही बाजूला स्थापना करून पूजा करावी. हेच

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

स्मार्त मत होय. याप्रमाणं शिवोपासकांनीं शिव मुख्य देवता व विष्णु आदि चार, चार भक्तदेवता अशी भावना धरून शिवपंचायतनाची उपासना करावी, विष्णुभक्तानीं विष्णुपंचायतनाची उपासना करावी या पद्धतीने सर्व देवतांच्या भक्तांना समान संधि प्राप्त करून दिली. हरि–हरांचे एकत्व प्रस्थापन करण्यांत स्मार्त मताने बरेच कार्य केले आहे.

२) हरि आणि हर एकरूप आहेत हे सिद्ध करण्यासाठी शरीराचा अर्धा भाग विष्णूचा आणि अर्धा भाग शंकराचा असणाऱ्या 'हरिहरा'ची उपासना सुरु झाली. त्याचप्रमाणे '**शंकरनारायण**' या नांवानेही उपासना प्रचलित झाली.

३) ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर एकरूप आहेत हा सिद्धांत प्रस्थापित करण्यासाठी, 'त्या तीनही देवानीं मिळून एक अवतार घेतला,' अशी 'तीन शिरे सहा हात' असलेल्या दत्तात्रयाची भावना केली गेली. **दत्तोपासना** प्रचलित झाली.

४) काहीं ठिकाणी विष्णूच्या नावानें शिवलिंग स्थापन केल्याची उदाहरणें आढळतात. आणखी काहीं ठिकाणी ब्रह्मा, विष्णु आणि महेश्वर या तीनही देवांची देवळे एकत्र असून, त्या सर्व देवळांत लिंग स्थापन केलेली असते.

५) शिव विष्णुरूपी आहे अशा भावनेने विष्णूला अर्पण करण्याची पूजाद्रव्ये शिवलिंगाला अर्पण करण्याचा प्रघात काहीं ठिकाणी दिसून येतो. उदाहरणार्थ–शिवलिंगाला शीतल जला–ऐवजी विष्णुमूर्तीप्रमाणे उष्णोदकाने अभ्यंग स्नान घालणे, विष्णु-प्रिय असलेला केवडा शिवाला वाहणे इत्यादि. काहीं शिवालयांत शिवलिंगासमोर मारुतीची स्थापना केलेली असते. हे सर्व प्रकार हरि–हरांचे एकत्व प्रस्थापनेचे प्रयत्न नव्हेत कां?

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

(१०) सर्व देवांच्या एकत्वाबद्दल माणिक प्रभूंचा अभिनव कोटिक्रम

एकदा माणिक प्रभूंच्या दरबारात एका मौलवीने आपला अल्लाच श्रेष्ठ आहे असा वाद मांडला. त्यावेळी झालेला माणिक प्रभु आणि मौलवी यांचा उद्‌बोधक संवाद खाली देत आहो.

माणिक प्रभु– तुमचे म्हणणे कबूल! परंतु तुमचा अल्ला आमच्या दत्तापेक्षा श्रेष्ठ कसा ते सांगाल?

मौलवी–अल्लाने जग निर्माण केले. साऱ्या जीवांनाही त्यांनेच निर्माण केले आहे.

माणिक प्रभु–अल्लाने सर्व मनुष्यांना निर्माण केले की केवळ मुसलमानांना?

मौलवी–अल्लाने मुसलमानांना आणि सर्व धर्मांच्या सर्व मनुष्यांना निर्माण केले आहे परंतु, मुसलमान कृतज्ञतेने अल्लास भजसात आणि अन्य धर्मीय लोक कृतघ्न होऊन अल्लास भजत नाहीत!

माणिक प्रभु–अल्ला हाच जगाचा व आम्हां–तुम्हां यच्चावत जीवांचा उत्पत्ति–स्थिति–लयकर्ता आहे. याचा प्रत्यक्ष बोध होण्या-साठी आम्हीं ही अल्लाचेच तीन मुखें असलेल्या दत्तरूपाला भजतो.

मौलवी–तसे असेल तर हरकत नाहीं. तुमच्या दत्तानेही केवळ हिंदूना निर्माण न करता, मुसलमानांनाही निर्माण केले असल्या–मुळे तोच आमचा अल्ला आहे!

याप्रमाणे माणिक प्रभूंचे विधान मान्य करून मौलवी परत गेला.

माणिक प्रभूंच्या रीतीनेंच शिवभक्तांनीं असे विष्णुभक्तांना म्हणावे–"विष्णूने केवळ वैष्णवांना उत्पन्न केले, की सर्व जीवांना? विष्णूने जग आणि सर्व जीवांना निर्माण केले असे तुम्हीं सांगता,
Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

त्याअर्थी आम्हालाही तोच निर्माता असल्यामुळे विष्णु आमचा देवही झाला. सर्वकर्ता, सर्वव्यापी आणि सर्वांतर्यामी अशा तुमच्या देवालाच आम्हीं शिव या नावाने भजतो. म्हणून तुमचा देवच आमचा देव आहे; *" असे निःसंकोचपणे सांगावे. विष्णुभक्तांनींही त्याच कारणासाठी "तुमचा देव तोच आमचा देव" असे मोकळ्या मनाने बोलावे. दोघानींही मिळून "एका देवालाच आम्हीं दोघे वेगवेगळ्या नामरूपांत भजतो! हे केवढे आश्चर्य आणि हा केवढा संतोष! !" असे म्हणून हस्तांदोलन करावे.

(११) हरि-हरांच्या व सर्व उपास्य देवतांच्या एकत्वाविषयी महापुरुषांचा उपदेश

१) **आद्य श्री शंकराचार्य** यांची "एको देवः केशवो वा शिवो वा" याप्रमाणे हरि-हराबद्दल सारखीच परमेश्वर-भावना होती. म्हणूनच त्यानीं शिव, विष्णु, देवीची (आणि दुसऱ्याही उपास्य देवतांची) स्तोत्रे अत्यंत अनन्य भक्तीने रचली आहेत.×

२) **श्रीरामकृष्ण परमहंस** यानीं भक्तांना एकदा असा उपदेश केला—"कोणत्या मूर्तीचे ध्यान करावे असा प्रश्न तुम्हीं विचारला; त्याला माझे उत्तर असे की, जी मूर्ति तुम्हाला प्रिय वाटते, तिचे ध्यान करावे. परंतु सर्व मूर्ति एकाच भगवंताची रूपें आहेत हे मात्र नीट समजून घ्या." शिव, काली, हरि हीं सर्व एका भगवंताची भिन्न भिन्न रूपे मात्र; हे ज्याने जाणले, तोच धन्य होय!"

—वचनवेद, भाग १

दुसऱ्या एका प्रसंगी परमहंसानीं असा बोध केला—

---

*your God is my God —G. De. Meuter

× वेळगांवचे श्रीगु[illegible] ग्रंथमालेतील 'भक्ति मंजरी' पहा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

"आमचा धर्मच चांगला, इतरांचा वाईट अशी भावना असणे बरे नव्हे. परमेश्वर एकच आहे, अनेक नव्हे. वेगवेगळे लोक त्याला निरनिराळ्या नावांनी ओळखतात. काही जण देवाला गॉड (*God*) असे म्हणतात; काहीं जण अल्ला म्हणतात, आणखी काहीं जण त्याला कृष्ण म्हणतात तर काहीं लोक शिव असे संबोधतात. उदाहरणार्थ:– एकाच पाण्याला एका भाषेचे लोक 'वॉटर (*water*)' म्हणतात तर दुसरी भाषा बोलणारे 'पाणी म्हणतात, तिसरे 'नीरु' म्हणतात व. व. परंतु पाणीरूपी वस्तु मात्र एकच असते.

–वचनवेद, भाग–१

विविध उपासकांचा संकुचित मनोभाव पाहून एकदा परमहंसानीं असे उद्‌गार काढले– "जेथे पहावे तेथे शाक्त, वैष्णव आणि शैव सांप्रदायाचे लोक भांडतच असतात! ज्याला आम्हीं कृष्ण म्हणतो त्यालाच शिव आणि त्यालाच शक्ति असेही म्हणतो हे समजण्याएवढी बुद्धि त्यांना नाहीं! **–वचनवेद, भाग–१**

३) **स्वामी रामतीर्थ** यानीं एका व्याख्यानात पुढील दृष्टांत सांगून सर्व धर्म आणि देवता यांचे एकत्व दाखविले आहे– लहान मुलांच्या एका शाळेतील शिक्षकाने तीन मुलाना आठ आणे देऊन "तुम्हाला आवडेल ते फळ विकत घेऊन खा" असे सांगितले. त्या मुलांना एकमेकांचीं भाषा कळत नव्हती; त्यामुळे कोणते फळ घ्यावे याबद्दल त्यांच्यात वाद उत्पन्न झाला. आंग्ल बालकाने आपल्याला वॉटरमेलन (*water melon*) हवे असे सांगितले, हिंदी बालकाने टरबूज पाहिजे असे सांगितले आणि मराठी बालकाने कलिंगडे घेऊया असा हट्ट धरला! यामुळे त्यांचे भांडण विकोपास गेले!!

त्याच वाटेने जाणाऱ्या [illegible] सद्‌गृहस्थाला त्या

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मुलांचे निरर्थक भांडण ऐकून अचंबा वाटला! त्या तिघानांही हवे असणारे फळ एकच होते, परंतु हे न समजल्यामुळे निरनिराळ्या नावांमुळे त्यांच्यात भांडण उद्भवले होते. त्या गृहस्थाने तीनही बालकांना त्यांच्या त्यांच्या भाषेत "तुला हवे असलेले फळच आणून देतो," असे सांगून एक मोठे कलिंगडे विकत आणले. तेंव्हा तीं मुलें 'होय होय, मला हवे असलेले फळ हेच" असे म्हणून नाचू लागलीं!!

त्या मुलांच्या भांडणाचे कारण कोणते होते? केवळ निरनिराळी नावें. दुसरे काहीं नाहीं! त्या नावाच्या पड्द्यामागे असलेली वस्तु पाहिल्यावरोवर भांडण संपले! त्याचप्रमाण केवळ नांवामुळे उद्भवलेले निरनिराळ्या पंथातील विरोध व कलह जाणत्याला हास्यास्पद वाटतात! "माझा देव, तुझा देव" असली वालिश भांडणे पाहून रामाला तमाशा वाटतो!!

४) **महात्मा गांधी** यानीं एका ठिकाणी असे सांगितले आहे–"तुम्हीं माझ्या रामाला शिव, अल्ला, अहुरमज्द असे हवे तर म्हणा. **जितकी माणसे आहेत तितकी त्याला नांवे आहेत.** तो एकमेवाद्वितीय आणि कालातीत आहे. तोच माझा प्रभु होय.'

गांधीजींच्या दैनंदिन प्रार्थनेमध्ये सर्व धर्मांतील देवतांच्या भजनांचा समावेश केला आहे. हरि–हरादि देवतां स्तोत्रांबरोवरच मुसलमान, ख्रिश्चन, यहूदी इत्यादि सर्व धर्मांची देवतास्तोत्रे आश्रमभजनावलीत घेतली आहेत. ह्या विषयी गांधीजींच्या एका निकटवासीने असे विवरण दिले आहे-"विविध धर्मांच्या बाह्यांगात भेद दिसत असला तरी अध्यात्माच्या आणि ईश्वरोपासनेच्या वाबतीत सर्व धर्मांत एकरूपता आहे. ह्या मूलभूत ऐक्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे धर्माचे सार–सर्वस्व टाकून

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

देऊन, केवळ बाह्यांगाची जड उपासना करण्यासारखे आहे. सत्याचा आग्रह सोडून केवळ माझेपणाचा आग्रह किंवा दुराग्रह धरण्यासारखे आहे. या दृष्टीने सत्योपासकाला सर्वधर्मसमभाव स्वतःसिद्ध सहज गुण असतो. यामुळेच गांधीजीच्या आश्रम-भजनावलीत सर्व धर्मांच्या भक्तिगीतांनां स्थान मिळाले आहे. भगवद्गीतेतील श्लोक व त्याचप्रमाणे कुराण, अवेस्ता, बायबल इत्यादि धर्मग्रंथातील प्रार्थना महात्माजींच्या दैनंदिन उपासनेचे अंग बनल्या आहेत. विष्णु आणि शिव यांच्या भजनांची तर बहुसंख्येने निवड झालीच आहे."

५) **श्री सद्गुरु सिद्धरामेश्वर महाराज*** यांचे देवतांच्या एकत्वाबद्दल मत—"तुम्हीं कोणत्या देवाचे उपासक आहात" असा कोणी प्रश्न केल्यास, श्री महाराज उत्तर देत—"मी शिव, विष्णु राम, कृष्ण, देवी, गणेश, अल्ला ह्या सर्व देवतांचा उपासक आहे कारण शिव, विष्णु इत्यादि सर्व देवांच्या एकमेव निज-स्वरूपास मी भजत असतो. या सर्व देवांच्या उपासकांबद्दल मला फार आदर आहे. त्यानीं भांडणाची प्रवृत्ति सोडून, आपल्या देवाचे सत्य स्वरूप समजून घ्यावे, त्यांची उपासना करावी-सर्व धर्म आणि धर्मीयांचा जयजयकार व्हावा अशी माझी उत्कटेच्छा आहे!"

(१२) श्री सद्गुरु भाऊसाहेब महाराज उमदीकर यांच्या सांप्रदायांतील हरि-हर ऐक्य

श्री. स. भाऊसाहेब महाराज यानीं आमच्या समाजांतील दोन मुख्य अंगे अशा ब्राह्मण आणि लिंगायत वर्गांना, विशाल

---

* श्री स. सिद्धरामेश्वर महाराज श्री स. भाऊसाहेब महाराज उमदीकर यांचे अत्यंत प्रेमळ शिष्य होत.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भक्तितत्त्वाच्या आधारावर एकत्र आणण्याच्या उद्देशाने, आपल्या सांप्रदायाच्या भजनांत हरि आणि हर या दोघांच्याही भजनाचा समावेश केला. "सांबसदाशिव, सांबसदाशिव" हे शिवभजन आणि 'विठ्ठल रखुमाई, हरि हरि, विठ्ठल रखुमाई" व "पावना रामा, पतीत पावना रामा" हे हरिभजन प्रचलित केले. सांप्रदायाच्या जयघोषात "पुंडलीक वरदा हरि विठ्ठल" व "पार्वतीपते हर हर महादेव" या दोनही जयघोषांचा अंतर्भाव केला. ह्या सांप्रदायात ब्राह्मण व लिंगायत या दोनही वर्गांतील गुरुभक्ति प्रसाराचे कार्य करतात.

श्री समर्थ भाऊसाहेब महाराजानीं कोणत्याही धर्माचा कोणत्याही कर्माचा व कोणत्याही देवाचा निषेध केला नाही. पण त्या त्या धर्ममतानुयायीना 'जन्मतः प्राप्त कर्म करण्यास सांगून व त्यांच्या देवाच्या मंत्राचाच (उदा: शैवांना शिवाय नमः ह्या मंत्राचा व वैष्णवांना 'श्रीराम' इत्यादि मंत्राचा) उपदेश देऊन, त्या सर्वांना आपापल्या धर्मांत राहूनहीं सांप्रदायाच्या विश्वधर्माचे आचरण करण्यास शिकविले.

आतापर्यंत अनेक धर्मस्थापकानीं एक विश्वधर्म स्थापन करण्याचा प्रयत्न करून विफल झाले आहेत. सर्व जातीना एक करावयास जाऊन त्यानीच एक नवीन जात निर्माण केली आहे. म्हणून व्यापक दृष्टींचे साधुसंतानीं, आहेत त्या जाती तशाच राखून, जातींची व्याप्ति सीमित करून (जेवण, वेष, पूजापद्धति आणि व्रतबंध, विवाह इत्यादि संस्कार एवढ्यात बाबतीत जातीं-चा स्वीकार करून) उपासनेच्या आणि ज्ञानाच्या विशाल वेदिके-वर सर्व जातीच्या लोकांना एकत्र आणणाऱ्या सांप्रदायांची उभा-रणी केली. शिवाय सर्व जातिकर्मांना उपासना-ज्ञानाच्या विश्व-धर्माचा अधिष्ठान असल्याने, सद्गुरूनी त्या व्यापक तत्त्वाच्या

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आधाराने कर्मादिकांचे विवरण करून, बाह्यतः भिन्न भासणाऱ्या देवता व पूजापद्धति तत्त्वतः एकरूप आहेत, अशी शिकवण देऊन सर्व धर्मांचे पूर्ण ऐक्य प्रस्थापित केले आहे.

(१३) शेवटचा सिद्धांत–हरि आणि हर एकरूप आहेत हा निर्णय आणि तदनुषंगाने सर्व उपास्य देवतांच्या ऐक्याचा सिद्धांत

येथपर्यंत विविध प्रकाराने विवेचन केलेल्या हरि–हरांच्या स्वरूपाबद्दल आणि त्यांच्या एकत्वाबद्दल आता आम्हीं निर्णयात्मक सिद्धांत मांडणार आहोत– शिवभक्त शिवाला 'परमेश्वर व नामरूपात्मक शिव' असे भजतात आणि विष्णुभक्त विष्णूला 'परमेश्वर व नामरूपात्मक विष्णु, असे त्याची भक्ति करतात, होयना? शिवभक्त आणि विष्णुभक्त यांची परम निष्ठा व खरी भक्ति पाहून, आम्हीं त्या दोघांचाही अभिप्राय प्रमाण मानून विचार करीत आहो. त्यांची उपासना शिरसा वंद्य समजून, दोघानांही लागू होईल असा सिद्धांत शोधण्याचा प्रयत्न करू. याप्रमाणे शिवोपासना आणि विष्णूपासना ह्या दोन्हीही सत्य आहेत हे गृहीत धरले असता–

परमेश्वरत्व + नामरूपात्मक शिव= परमेश्वरत्व + नाम–
रूपात्मक विष्णु ∴ ≡ सत्य परमात्मा

(कारण ही दोनही समस्त पदे सत्य परमात्म्याला सम आहेत.)

असे समीकरण निर्माण होते.

वरील समीकरणांत डाव्या आणि उजव्या बाजूच्या समस्त पदांत पहिले पद समान आहे. दुसरे पदही समान असल्यास समीकरण सिद्ध होते.

जास्त विचार केल्यास नामरूपात्मक शिव हा भक्तांच्या–
Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri
साठी सगुण साकार रूप धारण करणाऱ्या परमेश्वरशक्तीची

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

व्यक्तता आहे आणि नामरूपात्मक विष्णु सुद्धा त्याच शक्तीची व्यक्तता आहे, असें समजते. ह्या अर्थाने समीकरणांतील डावी-कडचे व उजवीकडचे दुसरे पदही सम होते. ओहो! आपल्या समस्येला उत्तर मिळाले!

शिव=विष्णू (परमेश्वरत्वाच्या दृष्टीने दोघेही समान आणि भक्ता-च्यासाठी शिवाचे व विष्णूचे रूप धारण करणाऱ्या परमेश्वर शक्तिरूपाने ही समान)

अखेरीस, शंकराचे व विष्णूचे एकत्व निःसंदिग्धपणे सिद्ध करणारे एक मनोरंजक उदाहरण सांगुन विषय आटपतो– शिव-भक्त काशीमध्ये **शिवला विश्वनाथ म्हणतात** आणि विष्णुभक्त पुरीमध्ये **विष्णूला जगन्नाथ म्हणतात**. आता सांगा बरे, विश्वनाथ म्हणजे कोण आणि जगन्नाथ म्हणजे कोण? ते दोघे निराळे असू शकतील काय? आश्चर्याची गोष्ट ही की, पुरीमधील जगन्नाथा-च्या देवळाच्या आवारांतच विश्वनाथाचे देऊळ आहे! आणखीन एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे पुरीमध्ये सर्व यात्रिकानीं दर्शन घेतलेच पाहिजे अशा **लोकनाथ** नांवाच्या शंकराचे देऊळ आहे! आता सांगा की, जगन्नाथ आणि लोकनाथ हे तरी निराळे असतील काय? **एक जगदीश्वरच विश्वनाथ, जगन्नाथ व लोकनाथ होय**, हे सुस्पष्ट असताना, याविषयी अधिक विवरण देणेच आम्हाला अवघड वाटते!

वरील प्रमाणे हरि-हरांचे ऐक्य प्रस्थापित झाल्यावर पुढचा मार्ग अगदी सोपा आहे. कारण, अन्य सर्व उपास्य देवता हरि-हरांप्रमाणेच परमोच्च स्थानी विराजमान असल्यामुळे, हरि=हर समीकरण आपण कितीही वाढवू शकतो. अर्थात्

हरि=हर= देवी= गणेश = अल्ला = येहोवा = अहुरमझ्द = इति शम्

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आत्मानुभव देणारी आमची अमोल पुस्तकें

१) आत्मज्ञानाची गुरुकिल्ली (१२ वे मुद्रण) ८-००
२) सुलभ वेदांत लहरी (८ वे मुद्रण) ५-५०
३) परमार्थ मार्ग प्रदीप (११ वे मुद्रण) ६-००
४) श्री सद्‌गुरु भाऊसाहेब महाराज यांचे सांप्रदायांतील भजन (१४ वे मुद्रण) १-८०
५) भगवद्‌गीतेंतील ध्यानयोग (६ वे मुद्रण) ५-५०
६) सुबोध कर्मयोग (२ रे मुद्रण) ६-००
७) यशस्वी जीवन दर्शन (३ रे मुद्रण) ६-००
८) भक्तीसाठी भांडण कां? ,, ६-५०
९) विवेक कुंज (३ रे मुद्रण) २-५०
१०) प्रबोध गीते (श्री ज. शंकराचार्य विरचित) ,, ५-००
११) वचनामृत (८ वे मुद्रण) ५-००
१२) साधकाशी हितगुज १-००
१३) श्री संत एकनाथ महाराज यांचे दर्शन (३ रे मुद्रण) ४-००
१४) आत्मानुभवाचीं साधनें ७-००

या शिवाय भक्ति-उपासनासाठी मिळणारी अमोल पुस्तकें

१) भक्तिमंजरी (श्री शंकराचार्य कृत) (२ रे मुद्रण) ६-००
२) श्रीदत्त सहस्रनाम ,, ,, (५ वे मुद्रण) २-५०
३) संत आणि सद्‌गुरुमहिमा (श्री एकनाथ महाराज कृत) ५-००
४) श्री सद्‌गुरु महात्म्य ,, ,, ४-००
५) श्री विठ्ठल नाममहिमा ,, ,, ३-५०
६) महायोगी एकनाथ दर्शन (३ रे मुद्रण) ६-००

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri